दिवाळी विशेषांक २०२४

# नवा वास्तुविचार

: संपादक :

डॉ. विलास पवार



ओम पब्लिकेशन

स्वागत मूल्य : २०१/-

With best compliments from

GSTIN: 27ADEPC1520G1Z8

MOB: 9819169101
9822776101

NEO ENTERPRISES
CALMING FEARS, SAVING LIVES

**ISO CERTIFIED 9001:2015**

**FIRE SAFETY ENGINEERS**

**MAHARASHTRA GOVT. APPROVED LICENSED AGENCY**

**HAVE A SECURE FUTURE WITH US**



ROW HOUSE NO. A-30, NEAR SAI BABA MANDIR, SECTOR- 12, KHARGHAR,
NAVI MUMBAI, 410210
BRANCH: CHIPLUN, RATNAGIRI
EMAIL: scneoent@gmail.com/ neokharghar101@gmail.com
WEB: www.neofire.net

दिवाळी विशेषांक २०२४

# नवा वास्तुविचार

-: संपादक :-

डॉ. विलास पवार

प्रकाशन

ओम पब्लिकेशन



ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- २५३६४१४१ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

**Email -** info@ompublication.com, **Website :** www.ompublication.com

# अंतरंग

## लेख

१.'नीट, जेईचा' विळखा-स्मिता हर्डीकर........................०५
२.माणसातला दगड आणि दगडातील माणूस-निशा शिंदे....... ०९

## कथा

१.रडू- संतराम पाटील................................ ११
२.आयुष्याच्या वळणावर- निलेश बामणे.......................१७
३.पायरी-किसन पेडणेकर.................................३१
४.विवाह बंधन-पुष्पा लंकेश्वर............................ ५१
५.रस्सीखेच-वैभव धनावडे................................५७

* काव्यसृष्टी....................................६५
* पाककृती...................................... ६८
* वास्तु टीप्स....................................७०




# संपादकीय

## वास्तू हवी जिव्हाळ्याची आणि जीवनदायी

आपण राहतो ते घर आपल्या सर्वांचे घर, प्राण्यांचे घर म्हणजे पृथ्वी. आपल्या घरात आपण सुरक्षित असायला हवे आणि घर आपल्याला सुरक्षा देत असते हे आपण विसरायला नको. एखादी वास्तू जी आपल्या स्वतःच्या वापरासाठी असते त्याला आपण 'घर' म्हणतो. पृथ्वी सर्व प्राणीमात्रांचे घर आहे हे जाणून आपण आपल्या सर्वांचे घर सुरक्षित राहण्यासाठी आपली वास्तू म्हणजे आपले घर सुरक्षित करायला हवे आहे. आपली वास्तू आपल्याला सुरक्षा, आनंद, समाधान हे सर्व देत असते. आपल्या धावपळीच्या जीवनात जे सौख्य आपल्याला घर आणि वास्तू देऊ शकते ते अन्य गोष्टींपेक्षा केव्हाही जास्तच असते. त्यामुळे आपण वास्तू-विचार नव्या पद्धतीने करायला हवा आहे. कोणत्याही प्रकारे निसर्गाला घातक असणाऱ्या वस्तूंचा वापर टाळायला हवा आहे. जितके जमेल तितक्या अल्प प्रमाणात करायला हवा आहे. प्लास्टिक, थर्माकोल इतर निसर्गातील हानी पोहोचणाऱ्या पदार्थ घटकांचा अतिरेकी वापर टाळायला हवा आहे. केमिकलचा आत्यंतिक वापर स्वच्छतेच्या नावाखाली टाळायला हवा आहे. घरातील गॅलरी, वरांड्यात पक्ष्यांना पाणी ठेवायला पाहिजे. जेणेकरून निसर्गातील पक्ष्यांचा वावर सोयीस्कर होईल. वीज, वातानुकूलित यंत्रणांचा वापर गरजेपुरता करायला हवा आहे. आपल्या घरात आपल्या वस्तूंना थंडगार वातावरण तयार करताना आपण घराबाहेरची उष्णता वाढवत आहोत याचे भान आपल्याला ठेवायला हवे आहे. आपल्या वास्तूत सौंदर्य निर्माण करताना आपण आपल्या सर्वांच्या घराला बाधा निर्माण करत नाही ना ? याची काळजी करायला हवी आहे.

आज जागतिक वातावरणात बदल अचानक झालेला नाही. मानवी स्वार्थी विचार त्याला कारणीभूत आहे. बेसुमार जंगलतोड करून वसाहती निर्माण करणे, जंगल आणि निसर्गचक्राला बाधा पोहोचवणे यासारखी कामे आपण आपल्या वास्तू निर्मितीसाठी केलेली आहेत. आजही आपण आपली वास्तू सुशोभित करण्यासाठी निसर्गातील घातक बाबींचा वापर करीत आहोत. रासायनिक घातक बाबींचा वापर टाळायला सुरुवात केली तर आपल्याला काही काळानंतर सर्व प्राणिमात्रांना गरजेचे वातावरण निर्माण होईल. आपण आपल्या वास्तूपासून सुरुवात केली, निसर्गावर प्रेम केले तर आणि तरच आपल्याला नैसर्गिक वातावरण भविष्यात मिळू शकेल. आपली वास्तू केवळ जिव्हाळ्याची असून उपयोग नाही; तर ती जीवनदायी सुद्धा असायला हवी. त्यासाठी आपल्याला प्रयत्न करायला हवा. दिवाळीच्या या उत्सवानिमित्त आपण त्याची सुरुवात करू या !

**दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा !**


टीजेएस्‌बी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
सोनेरी क्षणांनी सजलेली, चैतन्याची दिवाळी
सोनेतारण कर्ज
गृहकर्ज
शैक्षणिक कर्ज
ॲसेट बॅक्ड क्रेडीट
ऑटो फायनान्स कर्ज
एसएमई कर्ज
औधोगिक सौर योजना
टीजेएस्‌बी संदेश
संयुक्ता अकाउंट
फॉरेक्स सर्विसेस
टीजेएस्‌बी सोसायटी ॲप
डिजिटल (क्यु.आर. कोड, युपीआई लाईट, नेट बँकिंग, डेबिट कार्ड), मोबाईल बँकिंग, बीबीपीएस
*अटी लागू
www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 266 3466 I 1800 223 466

# 'नीट,जेईचा' विळखा

-स्मिता हर्डीकर

**देशा बरोबर स्वतः चा विकास करायचा असेल तर मोठ्या पगाराच्या नोकऱ्यांचा मोह करून त्या मागे धावण्यापेक्षा व्यावसायिक बनून दुसऱ्याला रोजगार देण्यावर भर द्यावा असे वाटते.**

मुलांच्या गळ्याभोवती आज ह्या 'नीट, जेईच्या' विळख्यात ती अडकली आहेत. वर्तमान पत्रात नीट, जेईच्या परीक्षां मध्ये गैर व्यवहार करणाऱ्या व्यक्तींना अटक करण्यात आली. त्यांच्या मोबाईल मध्ये मुलांचे डिटेल्स सापडले. आता ही अशी वेळ मुलांवर का यावी? इतकी जीवघेणी स्पर्धा आहे. आज ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले ते पेपर फुटल्यामुळे! मग हा बाकीच्यांवर अन्याय नाही का? एकदा परीक्षा देऊन जर तुम्हाला मार्क्स मिळत नसतील तर विद्यार्थी दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा ही पेपर देतात त्या प्रसंगी पालकांचा खर्च, क्लासेसच्या अफाट फिया ह्या वाया जातात. त्यांनी कोणत्या परिस्थितीत त्या भरलेल्या असतात ह्याचे भान विद्यार्थ्यांना असले पाहिजे. आपली क्षमता ओळखून त्यांनी वागले पाहिजे. पैसे भरून एकवेळ प्रवेश मिळेल पण आत्ताच न जमलेला अभ्यास नंतर जमेल का? अशा डिग्री घेऊन मग आपण चुकीचे निदान करणारे डॉक्टर ही बघतोच. डिग्री नसताना दवाखाने चालवणारे डॉक्टर्स बघतोच. इतका अट्टाहास का?खरे सोने कुठेही चमकते. मग आयुर्वेद, होमिओपॅथी, हेमेटोलॉजी, पॅथॉलॉजी, फिजिओथेरपी,तांत्रिक बघायचे झाले तर मेडिकल मध्ये आवश्यक यंत्रे, ऑपरेशन थिएटर मध्ये

लागणाऱ्या मशीन्स, डेंटिस्ट, फार्मसी, बायोटेक्नॉलॉजी, रिसर्च रेडिओलॉजि, ऑप्टोलॉजी, नर्सिंग ही अशी अनेक क्षेत्रे आहेत ज्यात मुले आपले उच्चशिक्षण पूर्ण करून भविष्य उज्ज्वल करू शकतात.

तीन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर जर तुम्ही ह्यातलेच क्षेत्र निवडणार असाल तर मग इतका अट्टाहास, मनस्ताप कशासाठी? काही विद्यार्थी आत्महत्येचा प्रयत्न करतात. माझ्या ओळखीत काहीही वेळ न पाळता दिवस-रात्र अभ्यास केल्याने ऐन पेपरच्या वेळी तो विद्यार्थी पॅरलाईज्ड झाला. ताप आल्याचे निमित्त झाले. इतका ताण कशासाठी?

एक लेख वाचनात आला. आई वडिल डॉक्टर असतानाही मुलाने ६ महिन्यानंतर त्यांना सांगितले की, मला सायन्स जमत नाहिये मला करायचे नाही. मग मुलाचे समाधान आणि शांती महत्त्वाची असे मानून त्यांनी खूप रिसर्च करून भारतात नवीन असणाऱ्या लिबरल आर्टस ह्या क्षेत्रात एडमिशन घेतली. परदेशात प्रसिद्ध असणारा हा कोर्स ज्यात आर्टस, कॉमर्स, सायन्स तिन्हीचे विषय शिकवले जातात आणि जो मेजर सब्जेक्ट असेल ती डिग्री दिली जाते. बीएसई ईन लिबरल आर्टस अशी. रिसर्च मेथलोलॉजी सविस्तर शिकवली जाते. परदेशात ग्राह्य धरले जाणारे हे कोर्सेस आहेत.

अलीकडे प्रगत मानले जाणारे कृत्रिम बुद्धिमत्ता (Ai) आणि मशीन लर्निंग (ML) विशेषज्ज्ञ, डेटा साइंटिस्ट, वेब डिझाईनींग, क्लाउड मार्केटिंग, एडव्हरटाईझींग, बायोइन्फॉर्मेटीक्स, मायक्रोबायोलॉजी, हॉटेल मैनेजमेंट, रिसर्च असिस्टेंट, सायबर सुरक्षा,ई कॉमर्स मधील कोर्सेस असे निरनिराळ्या क्षेत्रांतील शिक्षण घेता येऊ शकते. देशा बरोबर स्वतःचा विकास करायचा असेल तर मोठ्या पगाराच्या नोकऱ्यांचा मोह करून त्या मागे धावण्या पेक्षा



व्यावसायिक बनून दुसऱ्याला रोजगार देण्यावर भर द्यावा असे वाटते. गूगल, ॲमेझोन, मायक्रोसॉफ्ट यासारख्या कंपन्यां मध्ये क्लाउड कंप्यूटिंग तज्ज्ञ म्हणून डेटा, नेटवर्किंग, प्रशासन, सुरक्षा कोणत्याही क्षेत्रात काम करता येऊ शकते. वेब डेव्हलपमेंट करिअरला सध्या मागणी आहे. घरी बसूनही वेबसाईट बनवणे, वेब पृष्ठ बनवणे. अलीकडे भूगर्भशास्त्र तज्ञ,पर्यावरण शास्त्रज्ञ, ऊर्जा तज्ज्ञ अशी अनेक क्षेत्रे आहेत ज्यात उच्च शिक्षण घेऊन उज्ज्वल भविष्य घडवता येऊ शकते ह्या पर्यायांचाही विचार व्हावा आपली आवड, क्षमता, आर्थिक परिस्थिती, वेळ ह्या सगळ्या गोष्टींचा विचार करून योग्य निर्णय घेतला पाहिजे. आयुष्याची महत्त्वपूर्ण वर्षे, श्रम, शारीरिक



मानसिक आरोग्य विद्यार्थ्यांनी आणि सुजाण पालकांनीही नीट आणि जेई च्या मायाजालात अडकून पणाला लावू नये असे वाटते.

## स्नान

तिरंग्याची आणबाण शान राखण्यासाठी शत्रूशी दोन हात करतांना तो धारातीर्थी पडला. तिरंग्यात लपेटलेल्या त्याच्या शरीराला आईच्या अश्रूंनी शेवटचे स्नान घातले जात होते.

## मुखवटा

दिवसभर हास्याचा मुखवटा घालून ती फिरत होती; पण रात्री उबदार उशीचा स्पर्श होताच तिचा मुखवटा गळून पडला आणि तिच्या अश्रूंचा उशीला अभिषेक होत होता.

**- साधना झोपे**


# With best compliments from

## WOOD MALL


Furniture ideas from the world



**Opp. Raheja Garden, Near Tip Top Plazz,**
**L. B. S. Marg, Thane (w.)**
**Tel. : 022- 25838811/22**
**Fax :25838833**
**Website : www.woodmall.in**



# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



# दिलेश संखे

**कॉन्ट्रॅक्टर**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**पालघर.**

# फळ खाणं बेस्टच


ऋतुमानानुसार बाजारात येणारी फळं फक्त उत्तम आरोग्यच नव्हे, तर सौंदर्यवर्धकही असतात. तसंच ही फळं तुमचं सौंदर्य फुलवण्यास मदत करतात. फळं जशी आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण मानली जातात, तसंच ती सौंदर्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहेत.

**कैरी :** हल्ली कैऱ्या बाजारात दिसायला लागल्यात. आता त्या थोड्या महाग असल्या तरी त्या तुमची त्वचा मुलायम आणि कांतिमान बनवण्यास मदत करणाऱ्या आहेत. एक कैरी उकळवून त्याचा गर चेहरा, गळा, मानेवर चोळा आणि वाळल्यावर धुवा.

**संत्री :** संत्र्याची साल उन्हात वाळवून वस्त्रगाळ पूड करून ती दुधात कालवा. हे मिश्रण चेहऱ्यावर लावा. तेलकट त्वचेस याचा फायदा होईल. चेहऱ्याचा रंग उजळण्यास मदत होईल.

**काकडी :** त्वचा ब्लीच करण्यासाठी याचा रस चेहऱ्यावर चोळावा किंवा चेहऱ्यावर फोडी ठेवा. पंधरा मिनिटांनी चेहरा धुवा..

**डाळिंब :** पिकलेल्या डाळिंबाचे दाणे चेहऱ्यावर दररोज चोळा. त्वचेचा रंग हलका आणि गुलाबी होण्यास मदत होईल. ओठांवरूनही त्याचा रस फिरवा, ओठांचा रंग सुधारेल. चेहऱ्यावरील डाग घालवण्यासाठी डाळिंबाची साल कच्च्या दुधात वाटा आणि ती पेस्ट चेहरा, मानेवर लावा, सुकल्यावर धुवा.



दिवाळीच्या हर्षभरीत शुभेच्छा!

# श्रेयस पाटील

**कॉन्ट्रॅक्टर**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**पालघर.**

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

# राजू पाटील

कॉन्ट्रॅक्टर

सार्वजनिक बांधकाम विभाग

पालघर.

# माणसातला दगड आणि दगडातला माणूस !

-निशा शिंदे-खरात

**जमवलेला मित्र परिवार,जमवलेली माणसे ही त्यांची खरी संपत्ती त्यांच्याजवळ असल्याने त्यांना कसली कमी जाणवत नाही....पैसा असलाकी फक्त माणूस सुखी होतो हा भ्रम त्यांच्या सहवासात काहीवेळ गेलात तरी दूर होतो ...**

माणसाच्या एकमेकांबद्दल भावना सध्या दगडासारख्या कठोर झाल्या आहेत. स्वतःचे चांगले करण्यासाठी आणि फक्त स्वतः खूश राहण्यासाठी कसा आटापिटा चालला आहे. किती हे प्रयत्न.. मी कसा खूश राहीन...बस... यापलीकडे काही नाही. फक्त माझं कसं चांगलं होईल. मी एकटा कसा पुढे जाईन. फक्त स्वतःचाच विचार! किती लाजीरवाणं जगणे. समोरच्याच्या भावना, दुःख ना कळतं, ना दिसतं. दिसते ती फक्त स्वतःचीच प्रतिमा. अहंकार तर एवढा भरला आहे की, समोरचा हसला तरीही विचार करून त्याची कुवत ओळखून स्वतःच्या ठरवलेल्या प्रतिष्ठेला शोभेल तेवढीच स्माईल देणे. घटकेचा भरोसा नसलेल्या कलीयुगातील या माणसाला एवढी घमेंड कसली आहे?

आपल्या प्रगतीवर आपली प्रशंसा,आपल्या जिंकण्यावर आपली वाहवा, आपल्या कामगिरीवर आपली स्तुती, आपल्या दुःखात आपली साथ, आयुष्य जगण्यासाठी सोबती, शेजारी, मित्र या सर्व प्रकारे माणसाला माणसाचीच गरज भासते. मग थोडंसं त्या अहंकाराला बाजूला सारून ठेवलं तर किती सुखी होऊ आपण आणि समोरचा देखील आणि सगळेच, दुःखच पळून जाईल; या जगातील फक्त

एकमेकांच्या मिळालेल्या सहानुभूतीने. ना कुणी श्रेष्ठ ना कुणी कनिष्ठ. रसायनमिश्रित या कलयुगातील काळाचे सहवासी सगळे येताना एकटे जाताना एकटे. कितीही कमविले तरीही बरोबर कुणीच काही घेऊन जाणार नाही. सगळे इथेच ठेऊन जाणार आहोत आपण. मग कशासाठी एवढा आटापिटा. मग कशासाठी ही वेळ, हा क्षण आपण वाया घालवत आहोत.

पैसा भरमसाट आहे पण सुख नाही. चार शब्द प्रेमाचे बोलण्यासाठी जवळ माणसे नाहीत कारण आयुष्यभर तोच पैसा कमविण्यासाठी पुढे जाण्यासाठी, स्वतः फार वेगळे आहोत आपण ही भावना त्यामुळे तोडली गेलेली काही नाती. ना आयुष्यभर कमवलेला तो पैसा कामी येत. त्यासाठी तोडलेली ती माणसे पण कालांतराने दूर गेलेली असतात. खडतर होते जगणे मग. हे सगळे उशीरा कळते. सर्व निसटून गेल्यावर.

आपण एका दिवसात जेवढी उधळपट्टी करतो. त्यावर काहींचे महिनाभर घर चालते. पण ते लोक तरीही खूश असतात कारण ते समाधानी असतात. जमवलेला मित्र परिवार, जमवलेली माणसे ही त्यांची खरी संपत्ती त्यांच्याजवळ असल्याने त्यांना कसली कमी जाणवत नाही. पैसा असला की फक्त माणूस सुखी होतो हा भ्रम त्यांच्या सहवासात काहीवेळ गेलात तरी दूर होतो. उलट एका दिवसात भरमसाट पैसा उधळून पण हे असे जगणे, हे सुख त्यांच्या नशिबी नसते...आणि त्या कमवलेल्या पैशाने विकत देखील मिळत नाही हे असे सुख.

खरे सुख कशात आहे? पैशाने सर्व विकत घेता येत नाही. भरमसाट पैशाचा पण उपयोग नाही. माणुसकीने कसे सर्व जिंकता येते. जगू या सारे मिळूनी. अहंकाराला दूर सारुनी. मिळवू या स्वच्छंदी जगणे. राहूया बंधूभावाने. मिळवू या पोटापूरते एकमेकाला प्रेमघास वाटूनी. मिळवू या समाधान लाखमोलाचे जाताना चेहऱ्यावरचे. फुटू दे पाझर या हृदयाला. वाहू दे झरा प्रेम आपलेपणाचा, माणुसकीचा.



With best compliments from

# S. M. Construction

With best compliments from

# HARDEV

SALES AND SERVICES




Prop - Rajesh more

With best compliments from

# GANESH NAMDEV GAMBHIRE

सुशिक्षीत बेरोजगार अभियंता

With best compliments from



# MAHENDRA

**REALTORS AND INFRASTRUCTURE PRIVATE LTD**

**Prop -Bhavesh shaha**



# रडू....नको...आई ...!!!

-संतराम पाटील

**घरात शारदाच्या भोवतीन तिला धीर देण्यासाठी शेजारच्या आया बाया आल्या होत्या. शारदाच्या डोळ्यांतील पाणी त्यांच्या धीर देण्यातून काही थांबत नव्हते. पोटची मुलगी सावणी तिच्या जवळच होती.**

पंचेचाळीस वर्षीय शारदा आपल्या पती व दोन मुलांसह सुखासमाधानानं आपल्या घरात रहात होती. चार-पाच एकर शेतजमीन, दोन गुरं ढोरं आणि ही दोघं नवरा बायकू नी दोन पोरं हा मोजका संसार; फक्त शेतीवरच अवलंबून होता. त्यामुळे पती शिरपा त्याच्या शेतात वेगवेगळे प्रयोग करायचा आणि कमी खर्चात जास्त उत्पन्न घ्यायचा. हे करीत असताना कधी हातातल्या रोख पैशांचा वापर करायचा, तर कधी कधी खाजगी सावकार किंवा एखाद्या बँकेचे कर्ज सुद्धा उपसायचा. का तर? हे आसं केल्याशिवाय शेत पिकायचं नाही.

चार-पाच वर्षांपूर्वी असंच खाजगी सावकार आणि राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज काढून त्यानं विहीर खणून सगळ्या शेत-जमीनीत पाईपलाईन केली होती. पण पाणी उपसण्यासाठी मोटरपंपाला दोन वर्षे लाईट कनेक्शनच मिळाले नसल्यामुळे दोन वर्षे उत्पन्न बंद होते. म्हणजे म्हणावं तसं झालं नाही. कारण विहीर काढून काय उपयोग? लाईट नाही म्हणून पाणी नाही, मोटरपंप बंद म्हणून शेती कोरडवाहूच राहिली. त्यामुळे सावकार आणि बँकेचे हप्ते बंद झाले, व्याज मात्र चालू. या विचारचक्रात अडकलेला शिरपा हळूहळू कधी व्यसनाच्या आहारी गेला हे कुणालाच कळलं

नाही.

काही काळाने विजेच कनेक्शन मिळाले, पण दोन वर्षे शेती कोरडवाहूच राहिल्यामुळे, शेतातून आलेल्या उत्पन्नातून फक्त पोटपाणी, सावकर आणि बँकेचे व्याजच कसंतरी भागायला लागले. मुलांच्या शिक्षणाला परत कर्ज असं त्याचा प्रवास कर्जातून कर्जाकडे होऊ लागला होता. बऱ्याच वेळी कर्जाच्या व्याज भागवण्यासाठी सुद्धा शिरपाने कर्जच उचल केले होते. त्यामुळे त्याची आर्थिक कोंडी झाली होती.



चारचौघात दररोज उठबस करणारा शिरपा, आता एकाकी जाणवत होता. त्याचे दाराघरात जाणे बंद झाले होते. गावात फिरायला गेले तर सावकाराच्या पुढे जाणे त्याला अपमानास्पद वाटत होते. शिरपा जरी समोर दिसला तर चार माणसात सावकार पैसे मागून अपमानित करत होता. तर बँकवाल्यांचे हप्ते थकले असल्याने जमीनदार तोंड वर करू देत नव्हते. त्यामुळे शिरपाच्या समोर संकटाची मालिका उभी ठाकली होती. त्यामुळे त्याला गावात तोंड दाखवायला जागा राहिली नव्हती. ईष्ट मित्र दुरावले होते. त्याचे जीवन एकाएकी झाले होते. त्यामुळे तो थोडा नर्व्हस वाटत होता. बायका मुलांच्या सहवासात तो रहायला कचरत असायचा; जेवण खाण्या पासून तो दूरदूर जात होता; पण त्याला या कर्जाच्या खाईतून बाहेर पडायला मार्ग काही सापडत नव्हता.

त्या दिवशी सकाळी सकाळी सहाच्या दरम्यान, शारदा जनावरांच्या गोठ्यात गेली, जनावरांची शाण घाण काढली, म्हैस गोठ्यात स्तब्ध उभी होती. धारेची भांडी घेतली आणि धार काढणेसाठी ती कासेत बसली, तांब्यातील कोमट पाणी कासेवर मारून कास स्वच्छ धुऊन घेतली. पण म्हैस पान्हाच घालायला तयार नाही, ती सतत पान्हा चोरत होती. आता म्हैस पान्हा घालत नसल्याने म्हैसीचा मालक शिरपाला उठवण्या

शिवाय तिला पर्याय नव्हता म्हणून ती घरात शिरपाला उठवायला गेली. शिरपा घरात रात्री कधी सगळे झोपल्या नंतर येऊन गाढ झोपला होता. त्याच्या जवळ जाऊन तिनं हाक दिली "अहो ऐकलं काय, जरा उठून बघता काय, म्हैस धार देत नाही."

शिरपाकडून कसलंच उतर येत नव्हतं, की अंथरुणात थोडीही हालचाल होताना दिसत नव्हती. ती पुढे झाली आणी त्याच्या अंगावरचे पांघरुण ओढत परत म्हणाली "कसली झोप लागलीया मरणाची की काय ?उठा लवकर" आसं म्हणून शिरपाचा पालथा झोपलेला देह तिनं सरळ केला. तर शिरपाच्या तोंडाला आलेला फेस दिला दिसला आणि तिला काय समजायचं ते ती समजून गेली. तिचे हातपाय गळाले, पायात घामाने पाणी साठल्या सारखे झाले; तिचा शिरपा तिला कायमचा सोडून गेला होता. कधीही परत न येण्याच्या वाटेवर दोन पोरांच्याकडे नजर गेली. दोन्ही बछडे गाढ झोपेतच होते. त्यांचेकडे पहात तिने एकच हंबरडा फोडला.

"धनी.. .... ..धनी .....धनी!"

तिच्या आक्रोश करणाऱ्या आवाजाने मुले तर जागी झालीच; पण त्या सरशी शेजारी पाजारी सुद्धा हातातली कामं सोडून शिरपाच्या घराकडे धावत आले; पहातात तर शारदा शिरपाच्या शरीरावर स्वतःला झोकून देऊन प्रचंड आक्रोश करीत होती. तिला शिरपाच्या बॉडीपासुन जमलेल्या लोकांनी अलग केले आणि शिरपाच्या मृतदेहाचा ताबा घेतला. दोन्ही पोरं झोपेतून जागी झाली; पण त्यांना काय घडले आहे किंवा काय घडायला लागले आहे याची कल्पना येत नव्हती, पण ती दोन्ही पोरं शिरपाने या जगाचा निरोप घेतल्याने पोरकी झाली होती.

सावणी आणि शिवबा ही दोन्ही मुले पोरकी झाल्याची शारदाला जाणवायला लागले



होते. रडत हुंदका देत ती आपल्या दोन्ही बाळांना आईच्या आणि बाबाच्या नजरेतून पारखत होती. कारण आई आणि बाप या दोन्ही भूमिका तिला या पुढे एकटीलाच निभावून न्यावे लागत होते. सावणी नुकतीच अकरा वर्षांची झाली होती; तर शिवबा आठ वर्षांचा झाला होता आणि या दोघांना किमान दहा वर्षे तरी तिला सांभाळावे लागत होते. त्याचबरोबर घरसंसार सुद्धा आता एकटीलाच सांभाळावा लागणार होता. जन्मोजन्मीच्या जोडीदाराने सात जन्म देण्यासाठी हातात घेतलेला तिचा हात त्याने आधीच सोडून दिला होता. पुढे भविष्यात येणाऱ्या सगळ्या संकटाला तिलाच तोंड द्यायला पाहिजे होते. असे अनेक विचार तिच्या डोक्यात थैमान घालत होते आणि समोर तिच्या शिरपाचा निपचित पडलेला देह होता. तो आत्महत्या केलेला देह असल्याने त्याची लांबड न लागता त्याची विल्हेवाट लावायला गावातील गावकरी आणि भाऊबंद तयारीत होते आणि एकदाचा शिरपाचा देह उचलून घराबाहेर काढला आणि मग दोन्ही मुलांचा आक्रोश प्रत्येकाचा काळजाला भिडायला लागला; पण त्याला कुणाकडेच औषध नव्हते.



प्रेतयात्रा स्मशानाकडे रवाना झाली, शिरपाचा अखेरचा प्रवास चालू असतानां लोक आपसात शिरपा विषयीच्या चांगल्या-वाईट गोष्टींची चर्चा करीत होते. तो लहान शिवबा आपल्या नाजूक कानाने ऐकत होता. यातूनच शिरपाने आपले जीवन शेतीच्या विकासाच्या निमित्ताने काढलेल्या कर्जातून आणि ते कर्ज फिटेना म्हणून व्यसनाच्या आहारी जाऊन, गावातील देणेकऱ्याच्या जाचाला कंटाळून; आपलं जीवन संपवल्याचे ऐकत होता आणि तो लहान जीव आपल्या पुढील भविष्याची वाट शोधत होता. प्रेत दहन करून लहान

शिवबासह लोक घरी परतले.

घरात शारदाच्या भोवती तिला धीर देण्यासाठी शेजारच्या आयाबाया आल्या होत्या. शारदाच्या डोळ्यांतील पाणी त्यांच्या धीर देण्यातून काही थांबत नव्हते. पोटची मुलगी सावणी तिच्या जवळच होती. शिवबाने आईला बघीतले आणि पळतच गेला आईच्या गळ्याला मिठ्ठी मारली आणि एकच हंबरडा फोडला.

"आई.. ..आई.. .. आई.. .. "

बाबा परत येणार नाहीत काय?

शारदाने त्याला करकचून मिठ्ठीत घेतले आणि देवावर आपला राग प्रकट करीत म्हणाली "लेकरा तुझे बाबा देवाच्या दाराला शिरे लावायला गेले, ते नाही परत येणार " असं म्हणून तिनेही आपल्या डोळ्यांतील अश्रूंना वाट मोकळी करून दिली. ती हुंदक्यांनी दाटली होती. शिवबाने तिच्या डोळ्यांत पाहिले आणि आपल्या आईच्या गळ्याला पडला. अलग झाला. आईचा पदर हातात घेऊन तो आपल्या आईच्या कानात कायतरी सांगत होता. उपस्थित लोकांना वाटले तो आपल्या बाबाच्या मृत्यू बद्दल आईला कायतरी सांगत आसावा; लोकांच्यामधे निःशब्द शांतता पसरली. लोक शिवबा आईला काय सांगतो ते ऐकत राहिले. तो आईला म्हणत होता.

"रडू नको आई .....बाबा ज्या ..वाटेने गेले त्या वाटेने मी जाणार नाही....तुला तरास होईल आसं मी वागणार नाही...ताई बरोबर भांडण करणार नाही ...तुझ्या जवळ कसलाही हट्ट करणार नाही ...सावकाराचं कर्ज काढणार नाही... आणि तुला ताईला घरातील कुणालाही सोडून जाणार नाही, विषपिऊन बाबासारखं मरणार नाही..." त्या कोवळ्या जिवाच्या मुखातील ते शब्द शारदाला पर्वताएवढा आधार तर देत होतेच, त्या बरोबर जमलेल्या सर्व नातेवाईकांना शिरपाच्या जाण्याने या बाळराज्याच्या अंगात बारा हत्तींचे बळ आल्याचे सांगत होते. एका क्षणात त्याच्या शरीरात आणि अंगात इतका शहाणपणा कसा आला आणि कोठून आला याची चर्चा उपस्थित नातेवाईकांच्या मधे चालू होती.



शुभ दीपावली

# Pratham Group

PRATHAM BAJAJ
Authorised Two Wheeler Dealer In Thane

Manomay Yamaha

PRATHAM Chetak

SUMUKHA ITALIA

HERMES TVS

Choose your Favourite Bike this Festive Season


Chetak

YAMAHA RACING

Vespa aprilia

TVS

BAJAJ



THANE | BHIWANDI | BHANDUP | SATATRA | RATNAGIRI | KARAD | VASHI | NERUL | ULWE | PUNE | CHIPLUN | SHAHPUR

9769887555

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !



## श्री. उदय पाटील
## श्री. मिलिंद साठे
## श्री. अनिल नलावडे
## श्री. मामा मनोरकर

**कॉन्ट्रॅक्टर**

**सार्वजनिक बांधकाम मंडळ ठाणे**

# औषधे

१)औषधं आपल्या घरातील अविभाज्य भाग झाला आहे. आपण औषधं जवळ घेऊन झोपतो.

२)जी गोष्ट आपल्याजवळ नको तीच आपण जिकडे -तिकडे घेऊन बाळगतो.

३)आपल्या घरातील साधा बाम व विक्सचा पण **display** कमी करायचा आहे.

४)औषधं ही पॅक बंद **box** मध्येच हवी. बाहेरून दिसली नाही पाहिजेत. कपाटाच्या आत box मध्ये ठेवावीत.


५)औषधांचा **box** संपूर्ण घराच्या पश्चिमेला ठेवा किंवा संपूर्ण घराच्या पूर्व दिशेला ठेवला गेला पाहिजे.

६)पूर्व व पश्चिम दिशा नाही मिळाली तर दक्षिण, आग्नेय व वायव्य ह्या तीन दिशांपैकी कुठेही ठेवू शकता.

७)चुकूनही नैर्ऋत्य व ईशान्येला औषधे कधीच ठेवू नका. खूपच **negative** आहे. उत्तरेला पण नकोच.

८)योग्य जागी औषधे ठेवली तर त्याचा परिणाम चांगला होतो. आपली बचत चांगली राहते.

९)जी **health tonic** वापरतो, ते म्हणजे च्यवनप्राश यासारखी शक्ती देणारी **tonic** त्यांचा **display** करायचा आहे.



# With best compliments from

# MADGULKAR

## CONSTRUCTION



103 Kalika Tower, Opp. Pratap Cinema, Khopat, Thane West - 400 601.
E Mail :-sanjaymadgulkar@yahoo.com, Mob :-9323213383

With best
compliment trom

# KSHATRIYA

INFRASTRUCTURE PVT LTD

**Managing Director- Sanjay Sing**

**Happy Diwali**

**With best compliments from**

# Hirjibhai Veera Patel

Amrapali Arcade, Vasant Vihar, Thane

# आयुष्याच्या एका वळणावर

- निलेश बामणे

मला पूर्वी
वाटायचे की तू लग्न न करून आयुष्यात
फार मोठी चूक केलीस पण आता मला तसे नाही वाटत कारण
आता तुझ्या आणि आमच्या आयुष्यात फार फरक राहिलेले नाही.
उलट तू तुझ्या आयुष्यात स्वतःला खूप वेळ देऊ शकलास ज्यामुळे
तू समाजासाठी भरीव कार्य करू शकलास,

एका बागेमध्ये एक साठीचा पुरुष ( प्रणय) जॉगिंग करत असतो, जॉगींग करता करता घामाघूम झालेला तो घाम पुसण्यासाठी बागेतील एका बाकावर बसतो. बाकावर बसल्यावर समोरून जॉगिंग करत जाणाऱ्या सुंदर तुरुणीकडे तो एक टक पाहात असतो. इतक्यात त्याच्याच वयाचे दोन पुरुष त्याच्या दिशेने त्याच्याकडे पाहात जॉगिंग करत येत असतात. ते त्याच्या जवळ येताच आपला वेग कमी करतात आणि त्याच्या मागे हळूच येऊन उभे राहतात आणि त्यातील...

एक ( महेश ) : पिकल्या पानाचा !

दुसरा ( विजय ) : देठ की ओ हिरवा !

ह्या ओळी ते गुणगुणताच प्रणय भानावर येतो... आणि मागे वळून पाहात....

प्रणय : अरे महेश, विजय तुम्ही कधी आलात ?


महेश : जेव्हा ! तू त्या तरुणीला पाहात तुझे डोळे शेकवत होतास तेंव्हा !

विजय : हे काय ? प्रणय ! तुला शोभते का हे असे करणे ह्या वयात ?

प्रणय : ह्या वयात म्हणजे ? तुम्ही स्वतःला म्हातारे वगैरे समजत असाल; पण मी अजून स्वतःला म्हातारा वगैरे समजत नाही, तसेही घोडा आणि पुरुष कधीही म्हातारे होत नसतात.

आता मी तिच्या शारीरिक सौंदर्याकडे न पाहणे हा तिच्या सौंदर्याचा अपमान नसता का ठरला ?

महेश : तू इतकाच स्त्रियांच्या सौंदर्याचा चाहता होतास तर मग लग्न का केले नाहीस? सतत स्त्रियांपासून आयुष्यभर दूर का पळत राहिलास ?



विजय : प्रणय ! अजूनही वेळ गेलेली नाही! तू आताही लग्न करू शकतोस! तू जितका फिट आहेस ते पाहता कोणीही चाळीशीची स्त्री सुद्धा तुझ्याशी लग्न करायला तयार होईल! तशीही सध्या साठीत लग्न करण्याची नवीन फॅशन आलेलीच आहे.

प्रणय : मला जर लग्नच करायचे असते तर मी विशीतच केले नसते का? तेंव्हा माझ्या मागे मुलींची रांग लागलेली होती.

महेश : रांग तर आजही आहे! फक्त ती रांग आता वयस्कर स्त्रियांची आहे इतकाच काय तो फरक आहे.

विजय : तुझ्याकडे काम करायला सध्या जी बाई येते ती ही दिसायला काही कमी नाही, त्यात बिचारी विधवाही आहे.

प्रणयः तुम्हाला काही लाज–लज्जा आहे की नाही? अरे, तुम्ही आता आजोबा झालेले आहात याच तरी भान असूद्या!

महेश : आजोबा ! ते आम्ही फक्त जगासाठी झालेलो आहोत! पण नातवंडांचे सुख काही आमच्या नशिबात नाही...

विजय : हो ! आम्ही फक्त नावापुरते आजी-आजोबा झालेलो आहोत, नातवंडांचे सुख काही आमच्या वाट्याला कधी येईल असे वाटत नाही .

महेश : नातवंडांचे तर लांब; मला तर मुलांचेही सुख मिळालेले नाही... मुले लहान असताना त्यांच्या सुखासाठी काबाडकष्ट करीत

राहिलो, कधी स्वतः कोणतीच मौजमजा केली नाही की बायकोला करून दिली, मुलं जरा मोठी झाली, शिकायला परदेशात गेली, तेथेच लग्न करून स्थायिक झाली. आम्ही नातवंडे पाहिली ती ही फक्त मोबाईलवर ! त्यात तुमची वहिनीही मला अकाली सोडून गेली, आता जगतोय एकाकी जीवन जगायचे म्हणून! त्यातही तुमच्यासारखे मित्र आहेत म्हणून तरी जगणे जरा सोप्पे झालेले आहे, नाहीतर जगणे अधिकच अवघड झाले असते.

प्रणय : मग ! तू मुलांकडे परदेशात का राहायला जात नाही? तिथे निदान गोऱ्या गोऱ्या सुंदर स्त्रियातरी पाहता येतील.

महेश : मला या वयात नेत्रसुख नको! माझी मुले तेथे त्यांच्या आयुष्यात सुखी आहेत, त्यांच्यांकडे जाऊन त्यांच्या आयुष्याची बसलेले घडी आपण कशाला उगाच विस्कटायची! तशीही माझी लुडबूड त्यांना त्यांच्या आयुष्यात नकोच असेल...

विजय : हे बाकी महेश तू अगदी बरोबर बोललास ! तुझी मुले तर परदेशात आहेत; पण माझा मुलगा तर ह्याच शहरात काही मिनिटांच्या अंतरावर राहतो तरीही त्याची आम्हाला त्याच्या घरी एक दिवसही राहायला बोलवायची इच्छा होत नाही. आम्ही स्वतः तेथे राहायला जाणे हाही निर्लज्यपणा ठरेल. प्रणय ! मला पूर्वी वाटायचे की, तू लग्न न करून आयुष्यात फार मोठी चूक केलीस. पण आता मला तसे नाही वाटत. कारण आता तुझ्या आणि आमच्या आयुष्यात फार फरक राहिलेला नाही. उलट तू तुझ्या आयुष्यात स्वतःला खूप वेळ देऊ शकलास, ज्यामुळे तू समाजासाठी भरीव कार्य करू शकलास, ज्यामुळे आज समाजात तुझे नाव आहे, तुला मान-सन्मान आहे, तुझी स्वतःची अशी स्वतंत्र ओळख आहे, आम्ही काय केले? आमचे आयुष्य आमच्या मुलांना ओळख मिळावी म्हणून खर्ची घातली. पण त्याचा तरी काय उपयोग झाला? आज ते आमची ओळख जगापासून लपविण्यासाठी धडपडत असतात! त्यांना आई-वडील म्हणून आमची ओळख जगाला करून द्यायला लाज वाटते. तू बघ! तू आजही तुझ्या टोपणनावात तुझा वडिलांचे आद्याक्षर अभिमानाने मिरवतोस! तेहि तुझ्या वडीलांचा तुझ्या विचारांना विरोध असतानाही.

महेश : विजय बरोबर बोलतोय ! आम्ही ही आमच्या आयुष्याला एक वेगळा अर्थ देऊ

शकलो असतो, जर आम्ही फक्त मुलांचे भविष्य घडविण्यात गुंतून पडलो नसतो... आम्ही त्यांचे भविष्य तर प्रकाशमय केले; पण त्यांनी मात्र आमच्या भविष्यात फक्त आणि फक्त अंधारच पेरलेला आहे. पूर्वी मला वृद्धाश्रमात राहणाऱ्या लोकांबद्दल वाईट वाटायचे; पण आता नाही वाटत. कारण मलाही कधी -कधी वाटते आपणही एखाद्या वृद्धाश्रमात राहिलो असतो तर बरे झाले असते. निदान चार माणसे सोबतीला तरी असती, त्यांच्या सोबत खायला उठणारा दिवस सहज निघून गेला असता.

विजय : महेश ... तू बरोबर बोलतो आहेस... माझ्यासोबत निदान तुमची वहिनी तरी आहे... वेळ घालवायला...

प्रणय : महेश ... मग ! तू दुसरे लग्न का करीत नाहीस ?

महेश : केलेही असते; पण मला माझ्या बायकोच्या आठवणी नाही पुसाव्याशा वाटत... तू राहतोस ना एकटा तसा मीही राहिन... जास्तच असह्य झाले तर एखादा वृद्धाश्रमच गाठेन....

प्रणय : माझी गोष्ट तुमच्यापेक्षा जरा वेगळी आहे, हा एकटेपणा माझ्यावर कोणी लादलेला नाही, मी तो स्वीकारलेला आहे. कारण मला तो आवडतो ! पण मला जेव्हा तो एकटेपणा नको असतो तेंव्हा मी माणसांच्या गराड्यातही असतो. मला कोणी माझ्यापासून दूर गेल्याचे दुःख नाही. कारण कोणी जवळ असण्यात मी कधीच सुख मानत नाही. माझ्या कुटुंबात बायको-मुलं सोडून इतर सर्व नाती आहेत त्या नात्यांना मी



मिळेल तसा वेळ देत असतो. वास्तवात आज तसे पाहता तुमच्याकडे तसे काही कमी नाही... स्वतःची दोन दोन घरे आहेत. एका घरात तुम्ही राहता, एक घर तुमचे भाड्याने दिलेले आहे, ज्याच्या भाड्यातून तुमचा उदरनिर्वाह उत्तम

चालतो आहे ... तुमची मुले-नातवंडे तुम्हाला वेळ देत नाहीत त्यामुळे तुमच्याकडे भरपूर वेळ आहे त्या वेळेकडे एक संधी म्हणून पहा.. ! तुम्ही वृद्धाश्रमात राहायला जाऊ नका ! पण त्या वृद्धाश्रमात जे लोक राहतात त्यांची दुःख – सुखे तर जाणून घेऊ शकता. त्यांना फक्त आर्थिकच नाही, तर मानसिक मदत तर करूच शकता.

महेश : प्रणय ! हे बाकी तू बरोबर बोललास ! मी या दिशेने नक्कीच विचार करेन...

विजय : मी वृद्धाश्रमाचे समर्थन नाही करू शकतं ते कमी व्हावे अशीच माझी इच्छा आहे पण मी आणि तुमची वहिनी मिळून आम्ही नक्कीच त्यांच्यासाठी काहीतरी करू शकतो.

प्रणय : आजची पिढी त्या विंचवाच्या पिल्लांसारखी आहे, जी आपल्या अस्तित्वासाठी विंचविणीचे अस्तित्व मिटवून टाकते. त्यामुळे मागच्या पिढीला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी झगडावेच लागेल. त्या पिढीलाही दोष देण्यात काही अर्थ नाही... त्या पिढीने आपल्याला भविष्यात एकाकी जीवन जगायचे आहे हे सत्य अगोदरच स्वीकारले आहे. त्यामुळे ते हल्ली कोणत्याच नात्यात भावनिकरीत्या गुंतत नाहीत, अगदी मुलांच्या नात्यातही. त्यामुळेच समाजात जशी वृद्धाश्रमांची संख्या वाढत चालली आहे तशीच मुलांच्या वसतीगृहांचीही संख्या वाढत चाललेली आहे. तुमची मुले लग्न झाल्यावर तुमच्यापासून लांब झाली, पण त्यांच्या मुलांना ते लहानपणापासूनच त्यांच्यापासून लांब ठेवत आहेत. त्यामुळे भविष्यातील पिढीला आई-वडील असे एकत्र कधी वाट्याला येतील की नाही याबद्दल मला शंका वाटते. भविष्यातील हे चित्र मी अगोदरच पाहिल्यामुळे मी लग्न न करण्याचा निर्णय घेतला. लग्न ही वाईट गोष्ट आहे असे माझे अजिबात म्हणणे नाही, पण त्यात गुंतून पडणे मात्र नक्कीच वाईट आहे.

महेश : तू बरोबर बोलतो आहेस. माणसाच्या आयुष्यात एकटेपणा हा कधी ना कधी तरी येणारच, तो स्वीकारण्याची मानसिक तयारी प्रत्येक माणसाची असायलाच हवी ! ती नसेल तर माणसाच्या गराड्यात राहण्याची सवय लावून घ्यावी लागेल, जशी तू लावून घेतली आहेस. मी यापुढे माझा वेळ लोकहिताच्या कामासाठी खर्च करण्याचा निर्णय घेतलेला आहे. माझा आनंद आता मलाच शोधावा लागणार आहे.

विजय : याबाबतीत आम्ही दोघेही

तुझ्यासोबत राहू. आपल्या जगण्याला एक वेगळा अर्थ देऊ !

प्रणय : आज मला तुम्ही माझे मित्र असल्याचा अभिमान वाटतो... ह्या जगात आपले असे काही नसते. आज जे आपले आहे ते काल दुसऱ्या कोणाचे तरी होते. उद्या दुसऱ्या कोणाचे तरी होणार आहे.. मग वाईट कसले वाटून घ्यायचे? एकाकीपणाचा कंटाळा आला तर लोकांच्या गराड्यात हरवून जायचे जसा मी हरवून गेलो आहे.



इतक्यात काही तरुणी त्यांच्याजवळ येतात आणि प्रणयला म्हणतात, प्रणय सर, एक सेल्फी प्लीज ! प्रणय त्या तरुणींसोबत एक सेल्फी काढतो, दुसऱ्या सेल्फीत तो त्याच्या त्या मित्रांनाही घेतो... त्या तिघांना टाटा करत त्या तरुणी निघून गेल्यावर...

महेश : प्रणय ! कोण होत्या ह्या तरुणी..?

प्रणय : मी लिहिलेल्या एका नाटकात ह्या तरुणींनी काम केले होते...

विजय : कोणते नाटक ?

प्रणय : ते एक सामाजिक नाटक होते... आजची बहुतांश पिढी अविचारी नाही, पण स्वार्थी आहे... पण त्यातही अशी काही रत्ने आहेत, जी समाजहिताचा विचार करतात... ह्या मुली अनेक वृद्धाश्रमांना वेळ मिळेल तेंव्हा भेट देतात आणि त्या वृद्धाश्रमातील वृद्धांसोबत वेळ घालवितात.

महेश : अरे ! पण तू मागचे काही दिवस होतास कोठे ?

विजय : तुझी वहिणीही तेच विचारत होती.

प्रणय : मी माझ्या गावी गेलो होतो... तेथे आमची बरीच जमीन ओस पडलेली होती, जिथे काही फळझाडे लावून त्यांची काळजी घेण्याचे

नियोजन करून आलो, त्यातील काही झाडे जरी मोठी झाली तर पुढच्या पिढीला त्या झाडांची फळे खाता येतील... त्या निमित्ताने तरी पुढची पिढी आपले नाव काढेल.

महेश : कोणती झाडे लावलीस ?

प्रणय : हीच आपली... आंबा, फणस, पेरू, सिताफळ वगैरे...

विजय : एकदा तुझ्या गावी यायला हवे ! कधीपासून तुझ्या गावी 'येतो येतो' म्हणत होतो, पण वेळच मिळाला नाही.

महेश : मी पण येणार आहे .

प्रणय : चालेल ! पुढच्याच आठवड्यात आपण माझ्या गावी जाऊ या ! खूप मजा करू या! मी तर म्हणेन आपण प्रत्येक दोन-तीन महिन्यांनी तिकडे जाऊ या ! भरपूर झाडे लावू या !

विजय : चला आता गप्पा भरपूर झाल्या .... आपल्या नेहमीच्या टपरीवर जाऊन एक एक कप चहा मारू या !

महेश : चला ! हो ! पण आज रात्री तुम्ही माझ्याकडे जेवायला या ! मी छान काही तरी मागवतो हॉटेलातून...

प्रणय : कशाला? त्यापेक्षा आपण सर्व मिळून कोणत्यातरी छानशा हॉटेलातच जेवायला जाऊ! हॉटेलातील जेवण घरात मागवून जेवणे आणि हॉटेलात जाऊन जेवणे यात खूपच अंतर असते.

महेश : तसे तर तसे ! आपण मित्र जेंव्हा पूर्वी हॉटेलात एकत्र जेवायला जायचो तेंव्हा किती मजा यायची !

विजय : हो ! खूप मजा यायची ! चला आता.... चहा प्यायची आहे ना ?

(ते तिघे एका टपरीवर चहा पित असतात... इतक्यात एक मुलगी फुले विकत त्यांच्या जवळ येते...)

प्रणय : त्या मुलीला, बाळ ! शाळेत जातेस ना?

मुलगी : हो ! रोज... जाते !

प्रणय : बरं ! मला एक फुलांचा गुच्छ दे !

ते पाहून महेश आणि विजयही त्या मुलीकडून फुलांचे गुच्छ विकत घेऊन तिला पैसे देतात.

प्रणय : ही मुलगी खूप हुशार आहे. तिच्या लक्षात नसेल, पण तिच्या शाळेच्या कार्यक्रमात मी तिला भाषण करताना ऐकले आहे. ही मुलगी तुम्हाला कधीही फुले विकताना दिसली तर तिच्याकडून फुले विकत घेत जा. ती आपल्या

देशाचे भविष्य आहे. ते तिघे टपरीवर एक एक चहा मारतात आणि चहावाल्याचे पैसे देऊन रस्त्याने जात असताना समोरून एक पन्नाशीतील स्त्री डोळ्यांना गॉगल लावून येत असते. ती अचानक येऊन प्रणयला धडकते.

ती : सॉरी ! सॉरी !

प्रणय : ही नाटके बस्स झाली ! मला माहीत आहे तू मला जाणूनबुजून धडकलीस ! मी पाहिले होते तुला समोरुन येताना! मी ओळख करून देतो. हे माझे मित्र महेश आणि विजय ! आणि ही माझी मैत्रीण.

ती: नमस्ते ! मी कामिनी, प्रणयची मैत्रीण. अय्या फुले छान आहेत.

प्रणय : मग ! घे ! ही !

कामिनी : आज रात्री आपण कोठेतरी जेवायला जाऊ या का ?

प्रणय : आज नको ! आज रात्री मी ह्यांच्यासोबत जेवायला जाणार आहे.

महेश : त्यात काय ? त्यांनाही घेऊन जाऊ या की आपल्या सोबत.

कामिनी : हो ! हो ! मला चालेल...थँक यू! भावोजी .

प्रणय : भावोजी काय ?

विजय : मला चालेल भावोजी म्हटलेलं.

महेश : मलाही चालेल, कामिनी वहिनी.

प्रणय : काय भावोजी ? काय वहिनी? तिच्याकडे लक्ष नका देऊ ! तिला मस्करी करायची सवय आहे.



महेश : पण आम्हाला ती वहिनी म्हणून चालेल.

विजय : प्रणय काहीही बोल, पण तुमची जोडी छान दिसेल.

कामिनी : हो ! ना ! मागची कित्येक वर्षे

तेच मी त्याला समजावून सांगते आहे; पण त्याच्या लक्षातच येत नाही.

महेश : किती वर्षापासून तुम्ही ओळखता एकमेकांना?

कामिनी : चार पाच वर्षे झाली असतील.

महेश : मग आपली कधी भेट कशी झाली नाही?

कामिनी : मी गावाला असते. हल्लीच मुंबईला आली आहे.

विजय : प्रणय ! म्हणजे गावाला झाडे लावायला ह्याच मदत करतात वाटते तुला... ?

प्रणय : अगदीच तसे नाही, पण काही कामात मी तिची मदत घेतो गावाकडे! ती तिकडच्या शाळेत शिक्षिका आहे ना !

महेश : शिक्षिका ! छान !

विजय : कामिनी ! तुमचा मोबाईल नंबर द्या! म्हणजे आम्ही रात्री जेवायला जाताना तुम्हाला फोन करून रस्त्यात पिक-अप करू !

कामिनी : हो ! घ्याना ! ती मोबाईल नंबर सांगते. ते दोघे सेव्ह करून घेतात आणि तिला मिस कॉलही मारतात. चला भावोजी मी निघते ! बाय ! बाय विजय ! रात्री भेटू या !

विजय : बाय !

महेश : बाय

प्रणय : बाय ! बाय !

कामिनी निघून गेल्यावर.

महेश : ही परी तुला कोठे भेटली ?

प्रणय : काही नाही ! मी गावी एका कवी संमेलनाला गेलो होतो तिकडेच आमची भेट झाली.

विजय : तेंव्हाच 'झाडे लावा, झाडे वाढवा' सुरू झाले वाटतं !

महेश : एक सांगू ! खरंच तुमच्या दोघांची जोडी छान दिसेल ! तिचे लग्न झालेलेच नाही की ती विधवा अथवा घटस्फोटीत आहे ?

प्रणय : फार पूर्वीच तिचा घटस्फोट झालेला आहे ! त्यानंतर तिने दुसऱ्या लग्नाचा कधीच विचार केला नाही , निदान आमची भेट होई पर्यंत तरी !

विजय : इतक्या सुंदर आणि हुषार बायकोला घटस्फोट देणारा मूर्खच म्हणायला हवा !

महेश : हो ! पण घटस्फोटाचे कारण काय होते ?

प्रणय : ती आई होऊ शकत नव्हती. तिचे तिच्या नवऱ्यावर खूप प्रेम होते, पण ती मुलांना जन्माला घालू शकत नाही हे कळल्यावर

त्यांच्यातील दुरावा वाढत गेला, घरात भांडणे वाढू लागली, शेवटी तिने नवऱ्याला मोकळे करण्याचा निर्णय घेतला, तो मोकळा झाला, त्याने आनंदाने दुसरा संसार थाटला, त्याला मुलेही झाली, तो त्याच्या आयुष्यात सुखीही झाला पण कामिनीला मात्र तिच्या आयुष्यात आनंद शोधण्यासाठी सतत झगडावे लागले, आजही झगडावे लागत आहे.

महेश : प्रणय ! तू तिच्याशी लग्न करून तिच्या आयुष्यात नव्याने आनंद पेरू शकतोस.

विजय : हो ! महेश बरोबर बोलतोय !



प्रणय : कामिनी मला मैत्रीण म्हणून, एक स्त्री म्हणून आवडते पण माझे तिच्यावर प्रेम नाही ! मी तिच्यावर प्रेम नाही करू शकत, माझ्या वाट्याचे प्रेम करून झालेले आहे हे तुम्हाला चांगलेच माहीत आहे. आम्ही दोघे एकमेकांना आता लग्न केले तरी काही वर्षे फक्त सोबत करू शकतो ! त्यासाठी लग्न करण्याची आता मला गरज नाही वाटत.

महेश : या जगात तसा कोणाच्याच आयुष्याचा काही भरोसा नाही ! तुझे तिच्यावर प्रेम नसेल, पण तिचे तर तुझ्यावर प्रेम आहे ना ? आपण कोणावर प्रेम करतो यापेक्षा आयुष्यात आपल्यावर कोण प्रेम करते? हे खूप महत्त्वाचे असते. तुझ्या नशिबाने तुला या वयातही तुझ्यावर प्रेम करणारी कोणीतरी सापडली आहे हे तुझे भाग्यच म्हणावे लागेल.

विजय : कामिनी ! तुला तुझ्या आयुष्यात एक पत्नी म्हणून जशी स्त्री हवी होती अगदी तशीच आहे. ती तुझ्या आयुष्यात थोडी नाही खूपच उशिरा आली. पण काही हरकत नाही ! देर आये दुरुस्त आये !

प्रणय : पण जग काय म्हणेल ?

विजय : प्रणय! तू जगाचा कधीपासून विचार करायला लागलास ?

महेश : हल्ली जगाला दुसऱ्याच्याच काय पण स्वतःच्या आयुष्याचाही विचार करायला वेळ

नाही !

प्रणय : तुम्ही दोघे बोलताय ते योग्यच आहे! आनंद मिळवायला वयाचे बंधन नसते. माणूस कोणत्याही वयात त्याचा आनंद शोधू शकतो, नव्हे तो शोधण्याचा त्याला अधिकार आहे, तो अधिकार कोणीच नाकारू शकत नाही. आम्ही दोघे लग्न करून एकत्र आलो तर काही वर्षे का होईना एकमेकांच्या आयुष्यात आनंद पेरू शकतो.

महेश : नक्कीच !

विजय : आता उशीर करू नको ! आज रात्रीच आपण तुमचे लग्न ठरवून टाकू! हे ऐकल्यावर तुझ्या वहिनीला खूप आनंद होईल ! ती नेहमी म्हणते, मला एखादी लहान बहीण असती तर तिचे लग्न मी नक्कीच प्रणय भावोजींशी लावून दिले असते.

प्रणय : हो ! मला माहीत आहे. विजया वहिनींचा माझ्यावर सख्ख्या भावासारखा जीव आहे.

( रात्री ते सर्व एका हॉटेलात जेवायला एकत्र आलेले असतात आणि कामिनीची वाट पाहात असतात. इतक्यात समोरून छान सुंदर नटलेली साडी नेसलेली कामिनी येताना दिसताच )

विजया : प्रणय भावोजी ! इतक्या सुंदर परीसोबत लग्न करण्याचा विचार करायला तुम्हाला पाच वर्षे लागली, अहो! कोणीही पाहता क्षणी हिच्या प्रेमात पडावे इतकी सुंदर आहे ही !

कामिनी जवळ येताच प्रणय कामिनीची विजयाशी ओळख करून देताच विजया कामिनीला आपल्या मिठीत भरून घेते.

कामिनी विजयच्या बाजुच्या खूर्चीवर बसल्यावर.

विजया : कामिनी ! खरोखरच ह्या साडीत तू फारच सुंदर दिसते आहेस, अगदी तुझ्या नावाला शोभेल अशी.

कामिनी : विजया ताई ! ताई म्हटले तर चालेल ना ?

विजया : चालेल काय ? अगं धावेल ! मलाही एक लहान बहीण हवीच होती. तू माझी ती इच्छा पूर्ण केलीस ! आता मीही तुझी एक इच्छा पूर्ण करणार आहे.

कामिनी : माझी ! कोणती इच्छा ?

विजया : प्रणय भावोजींशी लग्न करण्याची !

कामिनी : खरंच ! प्रणय? माझा माझ्या कानांवर विश्वास बसत नाही.

प्रणय : हो ! कामिनी !! तू जे ऐकते आहेस ते खरे आहे.

विजया : कामिनी, पण तू तयार आहेस ना या लग्नासाठी ?

कामिनी : मी तर मागच्या चार वर्षांपासून तयार आहे...

महेश : कामिनी ! तुला प्रणयशी लग्न का करायचे आहे ?

कामिनी : महेश भावोजी! आम्ही दोघांनी या वयात लग्न केल्या न केल्यामुळे आम्हाला फार काही फरक पडणार नाही ! पण आपल्या आयुष्यात एक खरा पुरुष आला याचा आनंद मात्र मला नक्कीच मिळेल, मी विजयच्या विचारांनी प्रचंड प्रभावित झाले आहे, माझ्यासारख्या खूप स्त्रिया त्याच्या प्रेमात पडल्या असतील याची मला खात्री आहे; पण त्याची पत्नी होण्याचे भाग्य जर मला लाभणार असेल तर ते भाग्य मला हवे आहे. अगदी या वयातही! आमच्या लग्नानंतरही तो मला फार वेळ देणार नाही याची मला खात्री आहे पण तो माझ्यावर प्रेम करण्यात कोठे कमी पडेल असे मला वाटत नाही.

विजय : व्वा! कदाचित तुमची जोडी स्वर्गातूनच बनून आलेली होती. पण देव कदाचित आपण अशी एखादी जोडी बनविलेली आहे हे विसरून गेला असावा.

विजया : मलाही तसेच वाटते...

प्रणय : कामिनी, मी काही तुझ्यासोबत लग्न करून तुझ्यावर उपकार वगैरे करीत नाही ! तुला भेटल्यानंतरच माझ्या आयुष्यातील माझ्या पत्नीची जागा घेणारी स्त्री कशी असावी हा माझा



शोध संपलेला होता. पण कदाचित कोणाचा नवरा होण्याची हिंमत माझ्याच्याने होत नव्हती कदाचित.

महेश : चला! तर मग आता तुमच्या

दोघांचे लग्न ठरले हे आपण जाहीर करू या ! ते तुम्हाला करायचे तसे करा! पण आम्हाला लग्नाच्या पार्टीला नक्की बोलवा! पण आता तुमच्या दोघांचे लग्न ठरल्याबद्दल माझ्याकडून दिल्या गेलेल्या या पार्टीला सुरुवात करु या !

विजय : वेटर ! मेन्यू कार्ड लाना !

( त्यांची ऑर्डर आल्यावर ते तिघे जेवता जेवता )

विजया : कामिनी ! तुझ्या भुतकाळाबद्दल प्रणय भावोजींनी मला सर्वकाही सांगितले. तू आई होऊ शकत नव्हतीस यात तुझा काहीही दोष नव्हता, उलट निसर्गाकडून तो तुझ्यावर झालेला अन्याय होता. तुझ्या नवऱ्याच्या जागी जर प्रणय भावोजी असते तर मी खात्रीने सांगते; तुझ्यावर हा अन्याय झालाच नसता.

कामिनी : हो! मलाही त्याची खात्री आहे.

विजया : आता आमचेच बघ ! आम्हाला मुलं आहेत; पण ती असून नसल्यासारखीच आहेत. शेवटी आता आम्ही दोघेच एकमेकांसाठी आहोत. आता महेश भावोजी तर मुलं असूनही एकटेच आहेत. प्रत्येकाला हे जग कधी ना कधी सोडावेच लागते. पण ते सोडताना आपल्या सोबत चांगल्या आठवणी असाव्यात असे मला वाटते. भावोजी आणि तू! तुम्ही तुमच्या आयुष्यात आनंदीच आहात; पण तुम्ही लग्न केल्यामुळे तो आनंद द्विगुणीत होईल. तुमच्या मनात कोठेतरी असलेली अपूर्णत्वाची बोच कायमची नाहीशी होईल.

कामिनी : हो ! ताई ! तू अगदी बरोबर बोललीस ! जगण्यातून मिळणारा आनंद मग तो कोणत्याही वयात का मिळेना, तो प्रत्येकाने घ्यायलाच हवा! माणसाचा जन्म आपल्याला एकदाच मिळतो हेच गृहीत धरून आपण जगायला हवे !

प्रणय : कामिनी! एका पुरुषाकडून स्त्रीवर होणारा कोणताच अन्याय माझ्याकडून तुझ्यावर कधीच होणार नाही ! या एका गोष्टीची मी तुला झोपेतही हमी देऊ शकतो.

कामिनी : मला त्याची खात्री आहे.

विजया : पुढच्या आठवड्यात तसेही आपण तुमच्या गावी जाणारच होतो. तर तेंव्हाच तुमचे लग्नही उरकून घेऊ या !

महेश : हे उत्तम होईल !

विजय : मग ! तुम्ही जा हनिमूनला ! आम्ही तेथे झाडे लावत बसू !

त्यावर सारेच मनमुराद हसतात...

## टीप्स

### कपड्यांवरील बुरशीचे डाग काढण्यासाठी

तुमच्याही कपड्यांवर ओलाव्यामुळे बुरशीचे डाग लागले असतील तर काळजी करू नका. कारण काही सोप्या टीप्स वापरून तुम्ही घरीच हे डाग काढून टाकू शकता.

### लिंबू आणि मिठाचा करा वापर

स्वच्छतेसाठी लिंबू नेहमीच वरदान ठरतो. कारण लिंबामध्ये क्लिंझिंग इफेक्ट्स असतात. एखादा कठीण डाग काढण्यासाठी तुम्ही लिंबाचा नक्कीच वापर करू शकता. यासाठी लिंबाचा रस आणि मीठ एकत्र करा, फंगस लागलेल्या ठिकाणी लिंबाचे मिश्रण काही वेळ लावून ठेवा. रगडून तो डाग काढा आणि कोमट पाण्याने कापड धुऊन टाका.

### कोमट पाण्यात कपडे धुवा

पावसाळ्यात जर तुम्हाला कपड्यांना फंगसचे डाग लागू नये असं वाटत असेल तर कोमट पाण्याने कपडे धुवा. आजकाल वॉशिंग मशीनमध्येही हे फंक्शन असतं. शिवाय असं केल्याने तुमचे कपडे डिसइंफेक्टदेखील होतात. कारण कोमट पाण्यात जीवजंतू नष्ट होतात.

### बेकिंग सोडा वापरा

फंगसचे डाग कपड्यांवरून काढण्याचा सोपा मार्ग म्हणजे बेकिंग सोडा वापरणे. यासाठी फंगस लागलेल्या डागाकडील भाग भिजवा आणि त्यावर बेकिंग सोडा लावा. अर्ध्या तासाने ते कापड ब्रशने घासून स्वच्छ करा आणि कोमट पाण्यात विसळा.



### बोरेक्स पावडर वापरा

बोरेक्स पावडर हे असं एक केमिकल आहे, ज्यामुळे कपड्यांवरील फंगसचे डाग निघून जातात. यासाठी कपडे धुताना तुमच्या डिटर्जेंटसोबत या पावडरचा वापर करा.

*With best compliments from*

# Raja Construction

Government Contractor

**Pro. Kalpesh Bharat Kene**
**Eng. Rajesh Bharat kene**
**(BE civil & LLB)**

---

**At- Gorsai, Tal-Bhiwandi, District- Thane**

**दिवाळीच्या**

**हार्दिक शुभेच्छा!**

# श्री. मंगेश आवळे

महाराष्ट्र राज्य कंत्राटदार संघटना, विभागीय अध्यक्ष

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !



## श्री. संतोष बांदोडेकर
## श्री. पंकज कुलकर्णी
## श्री. हंसराज अहिरराव
## श्री. किशोर पटेल

कॉन्ट्रॅक्टर

सार्वजनिक बांधकाम मंडळ ठाणे

# पायरी

- किसन पेडणेकर

काय करूचा सांगा बघया तुमी.
बऱ्याच लोकांनी शेती करूची सोडली पण आमकां
नाय ओ जमना. दोन तरी फाळये शेती केल्याशिवाय
चैन नाय पडणा. खरा सांगा तुमका, आज्यापंज्याच्या काळापासून
करीत इलो ती जमीन, जेच्यार उत्पन्न घेवन
आम्ही पोसलो त्या जमनीक,

दहावीचा निकाल लागलेला असतो आणि सर्व मुले आनंदाने एकमेकांना शुभेच्छा देत असतात, मानसी नेत्राला आवाज देते,

"ए नेत्रा, अभिनंदन! खूप छान मार्कस् मिळाले तुला. परीक्षेच्या वेळी तर सांगत होती की, अभ्यासच नाही झाला म्हणून."

"थँक्स मानसी आणि नाही हां मी काही खोटं बोललेली. खरंच अभ्यास नाही झालेला, परंतु जे आठवत होत ते लिहिलेले आणि त्यातूनच मिळाले मार्कस् आणि तुझं गं, तुला तर माझ्यापेक्षा जास्त आहेत मार्कस्. चांगले ९५% मिळाले तुला, तुझं पण खूप खूप अभिनंदन," नेत्रा बोलते.

"थँक्स नेत्रा. तुलाही ९०% मिळाले म्हणजे कमी नाहीत हां. मग अकरावीला कोणत्या कॉलेजमध्ये घेणार आहेस ॲडमिशन. तसंही कोणत्याही कॉलेजमध्ये सहज मिळेल तुला ॲडमिशन".

"हो, बघू, बाबा म्हणतात की, मुंबईला जा काकाकडे. काकीपण सांगतेय यायला तिकडे. तिकडच्या कॉलेजमध्ये. जमलं तर जाईन, नाहीतर मग आपलं खर्डेकर कॉलेज आहेच. कधीही मिळू शकतं ॲडमिशन", असं म्हणत नेत्रा जोरात हसते आणि म्हणते, "हो ना. बेस्ट ऑफ लक"

मानसी काहीशी नाराजीच्या सुरात

सांगते, माहीत नाही गं. म्हणजे बाबा म्हणाले की त्यांना नाही जमणार पुढच्या शिक्षणाचा खर्च करायला. घरात खाणारी आम्ही चार तोंडं आणि कमावणारे बाबा एकटेच. त्यामुळे आता कुठेतरी काम बघायचं आणि बाबांना थोडा हातभार लावायचा. मानस आहे ना त्याला शिकवायचं अशी खूप इच्छा आहे माझी, मोठा अधिकारी



बनवायचं त्याला. मी नाहीतर माझा भाऊ तरी शिकेल.

"अगं पण तू एवढी हुशार असताना शिक्षण का अर्धवट सोडतेस. त्याला बनवायचं तर बनव ना अधिकारी, पण त्याच्याआधी तू पात्र आहेस अधिकारी बनण्यासाठी. तेव्हा तू नको ना माघार घेऊस. काहीतरी पर्याय निघेल. तू प्रयत्न तरी कर, बोल बाबांशी".

"हो गं नेत्रा, बाबांशी बोलणं झालंय माझं आणि मलाही कळतंय गं की त्यांचे हात तोकडे आहेत. त्यांना शक्य असेल तर जराही काही कमी पडू देणार नाहीत ते. पण त्यांचाही नाईलाज आहे गं. मला सगळं कळत असतानाही मी हट्ट केला तर मग काय अर्थ आहे. चल आता निघू या, तुला पण घरी जाऊन आनंदाची बातमी द्यायची आहे ना. आई-बाबा खूप खुश होतील ना. पुन्हा एकदा अभिनंदन. चल निघते मी," असं म्हणत पाणावलेल्या डोळे लपवत मानसी तिथून निघून जाते.

नेत्राला आपल्या हुशार मैत्रिणीला पुढील शिक्षण अर्धवट सोडावं लागणार याचं खूप वाईट वाटतं. आपण काहीतरी करायला हवं जेणेकरून मानसीला आपलं शिक्षण पूर्ण करून चांगली

नोकरी मिळायला हवी. तेवढ्यात तिकडून शाळेचे मुख्याध्यापक मेस्त्री सर येतात. शाळेतील सर्व मुलांवर त्यांचे बारकाईने लक्ष असायचे. कोण किती हुशार आहे आणि कोण किती मस्ती करतात ते बरोबर माहीत असायचं त्यांना. सर जवळ येऊन नेत्राला शुभेच्छा देतात,

"खूप खूप अभिनंदन नेत्रा तुझं. खूप चांगले मार्क्स मिळाले हां तुला."

वाकून नमस्कार करत नेत्रा बोलते, "धन्यवाद सर. तुम्हा सर्व शिक्षकांमुळे हे यश मिळालं सर"

"हो, पण तुम्हा मुलांची मेहनत पण तेवढीच महत्त्वाची होती. त्यामुळेच १००% लागला निकाल आपल्या हायस्कूलचा. आपली स्कॉलर कुठे गेली, नंबर एकची विद्यार्थिनी मानसी."

"ती आत्ताच घरी गेली सर."

"हो का, ठीक आहे. कोणत्या कॉलेजमध्ये घेताय प्रवेश दोघी. जोडी सांभाळा तुमची, धम्माल मस्ती आणि त्यासोबत अभ्यास."

चेहरा पाडून काहीशा निराशाजनक स्वरात नेत्रा म्हणते, "जोडी तुटणार असं वाटतंय सर आता. मी बहुतेक मुंबईत घेईन प्रवेश. काकी फॉर्म भरणार आहे मुंबईतील कॉलेजमध्ये आणि मानसी पुढचं शिक्षण अर्धवट सोडतेय."

हे ऐकून सरांना धक्काच बसतो आणि ते अक्षरशः ओरडतात, "का गं? आता काय झालं तिला. एवढी हुशार मुलगी आणि शिक्षण सोडतेय. वेडी झालीय का ती".

"नाही म्हणजे, तिला सोडायचं नसेल शिक्षण कारण तिला अभ्यासाची खूप आवड आहे. परंतु तिचे बाबा तिला नाही पाठवणार आहेत पुढील शिक्षणासाठी. त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना नाही शक्य होणार पुढील खर्च करणे. सर तुम्हीच काहीतरी करा ना, पण तिला शिक्षण पूर्ण करायला लावा. वाटल्यास मीपण मुंबईत न जाता तिच्यासोबत इथेच गावी शिक्षण घेईन. पण मानसी शिकली पाहिजे, खूप हुशार आहे सर ती आणि शिकून नक्की कोणीतरी मोठी अधिकारी बनेल याची खात्री आहे."

"हो मलाही कल्पना आहे याची. मी बघतो काहीतरी, तू नको काळजी करूस. चल जा आता घरी आणि आई-बाबा वाट बघत असतील. आणि तुमची मैत्री आणि त्या मैत्रीतील काळजी, प्रेम असेच निरंतर राहू दे."

खरंतर नेत्रा आणि मानसीची जोडी संपूर्ण

हायस्कूलमध्ये प्रसिद्ध होती. दोघीही अतिशय हुशार, गुणी आणि लाघवी होत्या. मानसी तर स्वतःच्या अभ्यासासोबत वर्गातील इतर जणांना कधीही काही मदत लागली तर अगदी तत्पर असायची. त्यामुळे सगळ्यांची लाडकी होती आणि तिने खूप शिकून मोठं व्हावं असं सगळ्यांना वाटायचं.

नेत्राला जेव्हा सांगितलं की, मानसी कॉलेजमध्ये जाणार नाही तेव्हा मुख्याध्यापक असलेल्या मेस्त्री सरांना आवडलं नाही आणि त्याचा जाब विचारायला ते तडक मानसीच्या घरी येऊन पोचले. मानसी एका अतिसामान्य कुटुंबातील एक साधी सरळ मुलगी होती. घर पण अगदी छोटं अन् साधंच होतं, जेमतेम सामान, बसायला लाकडी बाकडा वगैरे, तोडकीमोडकी खुर्ची. शेणाने सारवलेली जमीन, नांगर वगैरे शेतीची अवजारे टांगलेली इत्यादी.

"पडवळ काका येऊ का घरात?" असं म्हणत मानसीच्या बाबांना आवाज देतात. मानसीचे बाबा बाकड्यावर झोपलेले असतात आणि आई जेवणाची तयारी करत विळीवर खोबरं किसत बसलेली असते.

मानसीची आई सरांना बाहेर बघून पटकन उठून उभी राहते,

"अगे बाये माझे, मास्तरानू तुम्ही? हडे आमच्याकडे ?"

मानसीच्या बाबांना जोरजोरात उठवत,



"अहो उठा मास्तर इले हत. निजल्यात काय, चला उठा"

सर तिची धावपळ बघून तिला सांगतात की, अहो झोपू दे त्यांना. खरंतर मेस्त्री सर त्याच गावातील होते, परंतु मुलीच्या शाळेतील मुख्याध्यापक असल्याने आदरभाव वेगळा होता.

मानसीचे बाबा तर धडबडून उठतात, तसे

सर त्यांना सावरत म्हणतात, "अहो काका सावकाश, असं घाईघाईत उठू नये झोपेतून"

आईला लगेच बाबांना बोलायची संधी मिळते, "तशेच ते, निसते धांदरट. कितक्याय सांगला तरी असेच करतत. पण मास्तरांनू तुमी आज आमच्याकडे कशे काय इल्यात ता नाय सांगल्यात. आमचा बाय शाळेतंच गेला हा आज रिजट आसा म्हणान. येवक नाय अजून घराकडे. तुमका गावाक नाय काय शाळेत ता? "

"नाही म्हणजे ती आली होती शाळेत, पण माझी भेट नाही झाली. तिने रिझल्ट घेतला आणि लगेच निघाली मला न भेटता".

बाबांना वेगळंच टेन्शन येतं, तुमका भेटाक नाय? म्हंजे नापास झाला की काय? शिरा पडो व्होरान तेच्यार. अहो दिस-रात अभ्यास करी होता ता कसलो तर. आता नापास झाला हुनान जीव-बीव देवक जावक नाय मा? अगो जा बग जा होळार गेला तर उडी मारुक , असं म्हणत आईला तिला शोधायला जा म्हणून आग्रह करू लागतात परंतु त्यांना थांबवत सर सांगतात की,

"अहो काका कशाला जीव देईल ती. चांगले ९५% मिळाले तिला मार्क आणि आमच्या हायस्कूलमध्येच नाहीतर संपूर्ण तालुक्यात पहिली आलीय ती. तसंही पास होवो न होवो तुम्हाला कुठे कौतुक आहे तिचं. घरीच बसवणार आहात ना पास झाली तरी".

बाबा काहीसे भानावर येत, "तसा न्हाय ओ मास्तरानू, चेडू धावी पास झाला तर अभिमानच हा आमका. ते चांगले मार्क आमकां नाय ओ कळणत पण एकदा पॉर मॅट्रिक झाला काय मगे लगीन ठरयताना बरो शिकलेलो पोरगो गावता. चांगलो घो गावलो काय आमी मोठ्ठ्या जबाबदारयेतसून मोकळे काय समजला. आता आणखी कित्या शिका होया. पोरीची जात, व्यवारापूरता शिकला म्हणजे खूप झाला".

"पोरीचं लग्न करून देण्यासाठी का शिकवताय मुलीला. अहो तुमची मुलगी हिरा आहे हिरा, तिला योग्य पैलू पाडले तर चमकून उठेल, तिच्या गुणवत्तेला आपल्या सर्वांच्या सहकार्याची गरज आहे, तिची हुशारी अशी वाया जाता कामा नये. तिने पुढे शिकलं पाहिजे, तिला आवडेल त्या विषयात तिने प्रावीण्य मिळवलं पाहिजे. काका तुम्ही तिचं शिक्षण बंद करू नका. मी विनंती करतो तुम्हाला."

"माझा चेडू आसाच ओ हुशार पण मिया

तरी काय करू, माझे हात तोकडे आसत ओ. आमचा कसा हा मास्तरानु म्हायती हा, आंग झाकुक गेलो काय पाय उघडे पडतत आणि पाय झाकुक गेलो काय पॉट उघडा दिसता. हयत्या कोनवाशातसून गळता थय म्यान कापड घालून भिंती वाचयतो पावसापासून. शेतीतर करतो आमी पण गिमात पेजयेक तांदूळ आमकाच इकत हाडूचे लागतत. कित्या तर शेती केली तरी भात धड पोसूना नाय, पोसूला तरी मधीच पावस



लागलो काय उभ्या रवला सगळा कुनग्यात झोपता आणि पाणयात कुसान जाता. थोडेसे भावनिक होऊन सांगू लागतात, "पण ही जमीन आवस आसा आमची तिका अशी निसती ठेवक धीर होना नाय ओ म्हनान करतो शेती. मगे तुमीच सांगा कसा जमतला आमकां पुढचा शिक्षण घेवक. नुसती स्वप्ना दाखोन काय करूचा हा," आपली खरी व्यथा आणि खंत मानसीचे बाबा सरांसमोर बोलून दाखवतात.

सरांना त्यांच्या मनात काय चाललंय याची कल्पना येते, त्यांना धीर देत ते सांगतात, "पण काका परिस्थिती अशी आहे म्हणून स्वप्न बघायची सोडायची नसतात; तर स्वप्न बघून ती पूर्ण करायची असतात".

त्यावर अधिक हतबल होत म्हणतात, "निजल्यार आमकाय स्वप्ना पडतत ओ मास्तरांनु पण डोळे उघाडले काय फुटलेल्या नळ्यातसून वरती निळा आभाळ दिसता आणि आमचे डोळे खाडकन उघाडतत. तेव्हा आमच्या चुलीर ठेयलेल्या टोपात कितक्या शिल्लक रवला हा ता आमका म्हायती आसा तेव्हा वगीच कोणाक जेय जेय म्हणान खोटो आग्रह कसो करू सांगा तुमी".

बाबा बोलत असताना मानसी बाहेरून येते आणि दरवाज्यात उभं राहून ऐकत असते. सरांचा आग्रह मानसीच्या बाबांना मोडवत नव्हता

परंतु परिस्थितीने हतबल असल्याने ते त्यांना ठामपणे सांगू शकत नव्हते. आता मानसी पुढे येऊन सरांना बोलते,

"सर, बाबा बरोबर बोलतात मला नाही जमणार पुढचं शिक्षण घ्यायला. त्यांची खूप इच्छा आहे मला शिकवायची, परंतु आमची आर्थिक स्थिती मला नाही करू देणार"

तिला थांबवत मानसीची आई बोलते,

"अगो पोरा खय गेल्लय, मास्तर कधीचे इलेत आणि वाट बघतत तुझी आणि दोन मोठी माणसा बोलताना ल्हान पोरांनी मधीमधी बोलाचा नसता."

खरंतर मानसीच्या आईचीही इच्छा असते की, आपल्या मुलीने खूप शिकावं, तिला चांगली नोकरी मिळावी आणि आपले हलाखीचे दिवस बदलावेत.

मानसीच्या आईला थांबवत सर बोलतात, "मग काय रिझल्ट न्यायला आली आणि गुरुजनांना न भेटता घरी निघून आलीस म्हणून मग गुरू स्वतः आलेत आपल्या शिष्याला भेटायला". (मानसी सरांना नमस्कार करते) अभिनंदन मानसी, खूप खूप यशस्वी हो, भरपूर शीक आणि मोठी हो आणि आईबाबांसोबत आम्हा गुरूजनांचं नावही मोठं कर.

"थँक्स सर तुमच्या शुभेच्छांचा स्वीकार करते. परंतु सॉरी, मला वाटतं की तुमचा आशीर्वाद मात्र फुकट जाणार"

"मानसी, एक लक्षात ठेव, गुरूच्या मुखातून निघालेला शब्द आणि आपल्या शिष्याला मनापासून दिलेला आशीर्वाद कधीच फुकट जाणार नाही. तुझ्याबद्दल निघालेला प्रत्येक शब्द खरा होईल आणि तू आमच्या मनातील इच्छा पूर्ण करशील आणि तुझ्या आईवडिलांचे नाव नक्कीच मोठं करशील याची खात्री आहे".

"तरीही सर मला वाटतं की, माझे बाबा म्हणतात त्यानुसार मला माझं शिक्षण इथेच थांबवावं लागेल. बाबांना नाही झेपणार पुढील शिक्षणाचे खर्च करायला. तसेच माझ्या मागून माझा भाऊ आहे, त्यालाही शिकवायचं आहे, त्याचा खर्च आहे. आता मलाच हातभार लावावा लागेल बाबांना"

"अगं होईल भावाचंही शिक्षण पूर्ण. दहावीपर्यंत त्याच्या शिक्षणाची जबाबदारी माझी. त्यानंतर कसं करायचं ते त्यावेळी ठरवू. आता राहिला प्रश्न तुझ्या शिक्षणाचा तर तेही पूर्ण होईल. तुला तालुक्याच्या ठिकाणी कॉलेजमध्ये प्रवेश

मिळवून द्यायची व्यवस्था मी करतो. कॉलेजमध्ये लायब्ररी आहे तिथून तू पुस्तके घेऊ शकतेस अभ्यास करायला आणि तुला वर्षभर लागणाऱ्या वह्या आमच्या समाजाचं एक मंडळ आहे ते दरवर्षी वह्या पुस्तके वाटप करतात, त्यांना पुढील दोन वर्षे तुलाही द्यायला सांगेन."

मास्तर एवढं सगळं बोलत असताना मानसीच्या बाबांना खरंतर गहिवरून येतं आणि ते सांगतात, "मास्तरानू तुमची काळजी समजता आमका पण फक्त कालेजात गेला म्हणजे नाय ना झाला. बाकी वर्षभर खर्च आसा मओ. आणि तो मागाक रोजरोज तुमच्याकडे येवक नाय जमाचा तेका. गाडीभाडा आसा, मधीमधी कसले फी भरूक सांगतले, तालुक्याक जावचा म्हणजे बरे कपडे होये, कधी भूक लागली तर दोन पैशे खिशात देव होये, हयासगळा कसा झेपतला सांगा तुमी आमकां. अहो हयसर आमकां दोन टायम अन गावताना मुश्कील ता कॉलेज कसा करूचा सांगा बघया. मिया हयतो कोयतो कुऱ्हाड घेतलंय काय खय काम गावता काय बघुक जातलंय रोज. कधी कोणाकडे गावला तर गावातला नायतर मगे तिठ्यार चायचो घोट घेवन परत घराक येतलय. शेती करतो तिचाय काय खरा नाय. गिमात तेची मशागत करूची लागता, मरमर मरान करूक होया आणि मातयेची भर करू होई. कधी पोसवाक नाय म्हणान रडतलो तर कधी पावसाक गाळी घालतलो तर कधी कीडीन नास झालो म्हणतलो. काय करूचा सांगा बघया तुमी. बऱ्याच लोकांनी शेती करूची सोडली पण आमकां नाय ओ जमना. दोन तरी फाळये शेती केल्याशिवाय चैन नाय पडणा.



खरा सांगा तुमका, आज्यापंज्याच्या काळापासून करीत इलो ती जमीन, जेच्यार उत्पन्न घेवन आम्ही पोसलो त्या जमनीक, आवशिक अशी ओसाड ठेवक जिवार येता ओ. ती भरलेली, हिरवीगार दिसली काय कसा जीवाक बरा वाटता." (बाबांना

गदगदून येतं आणि ते रडू लागतात) सर मानसीच्या बाबांना समजवण्याचा प्रयत्न करतात, ''अरे काका रडताय कशाला." अहो तुमच्यासारखा विचार तर हल्ली कोणीच करत नाही. जास्त पीक काढण्याच्या नादात जमिनीची मशागत न करता महाभयंकर रासायनिक खतांचा वापर करून पीक घेतात. परंतु ते पीक किती खाण्यायोग्य आहे याचा कोणी विचारचं करत नाही. काहीजण तर कंटाळा म्हणून शेती करायचं टाळतात आणि जमिनी ओसाड पडून राहतात. ऐशोआराम करायच्या हव्यासापोटी, क्षणिक सुखासाठी वडिलोपार्जित जमिनी विकून मोठमोठ्या गाड्या घेतात, बंगले बांधतात. पण तुम्ही यापलीकडे जाऊन किती पीक मिळेल, किती फायदा होईल हे न बघता फक्त जमिनीचा विचार करता आणि शेती करता. राहिला प्रश्न मानसीच्या इतर खर्चांचा. तर त्याची काळजी नका करू. मी घेतलीय ना जबाबदारी; मग तुम्ही निश्चिन्त रहा. तुम्ही फक्त तिला कॉलेजला पाठवा. बारावीमध्ये ती याच्यापेक्षा जास्त मार्क मिळवून पास होईल याची खात्री आहे मला आणि मी तुम्हाला सांगतो ती तुमची मेहनत व्यर्थ वाया जाऊ देणार नाही अन माझा विश्वास खोटा ठरू देणार नाही. मानसीला वेगळंच टेन्शन येत आणि तसे ती विचारते, ''सर पण तुम्ही कसे करणार सगळं मॅनेज." सर तिला सांगतात की, त्याची काळजी तू नको करू. तू फक्त नीट अभ्यास करायचा आणि एक लक्षात ठेव, तू जरी कॉलेजमध्ये गेलीस तरी कॉलेजमधून घरी आल्यावर आई -बाबांना मदत करायची, त्यानंतर मग अभ्यास करायचा. कोणतीही कारणं चालणार नाहीत.

"हो सर, मी नक्की करेन. मी घरातली कामे सांभाळून अभ्यास करेन. पण त्याआधी बाबांची परवानगी मिळाली पाहिजे ना", मानसी सरांच्या सगळ्या अटी मान्य करते आणि बाबांच्या होकाराची वाट बघत".

"काका सांगा आता तिला. तुमची मुलगी मोठी अधिकारी झालेली बघायची आहे ना. मग द्या तिला आता परवानगी. तुमचं नाव मोठं केल्याशिवाय राहणार नाही ती".

"मिया काय बोला आता. तेका फुडे शिकाचा आसा आणि तुमी तेची जबाबदारी घेत असश्यात तर मिया बाबडो कोण तुमका अडवनारो. पण चेडवा याक कायम लक्षात ठेय, माझ्यापेक्षा ह्या

मास्तरांचो जास्त इश्वास आसा तुज्यार. तेवा तेंचो इश्वास तोडू नको. खुप मोठा हो, पैश्यान भिकारी आसलय तरी माझो कायम आशीर्वाद आसा तुझ्याबरोबर."

मानसी बाबांना आणि सरांना खात्री देते की, "होय बाबानू, तुमचो फक्त आशीर्वाद असलो तरी मिया सगळी शिखरा पार करीन आणि तुमी दोघेयजण माझ्यासाठी जा करतात तेचो एक थेंबभर पण वाया जावक देवचय नाय मिया. तुमका सगळ्यांका अभिमान वाटात असाच काम करून दाखयन ह्यो शब्द आसा माझो".

"ठीक आहे. बघा काका आता मुलीने शब्द दिलाय आपल्याला आणि मानसी तू तुझी पायरी ओळखून चाललीस की कधी ठेचही नाही लागणार आणि अडखळून पडणारसुद्धा नाही."



"होयतर, आणि पॉर माझा आसाच गुणी, एकदा ठरयल्यानं काय मगे कसाच मागे येवचा नाय".

"अगदी खरंय. चला मी येतो आता, तुम्ही तुमचा आनंद साजरा करा. काकी चांगलं गोडधोड बनवा आणि खाऊ घाला मुलीला."

आई सरांना थांबवत म्हणते, "मास्तरांनू तुमीपण थांबा, जेवनच जाया आता."

"आज नको. आता तुमच्या घरी जेवायला येईल तो मानसी बारावीत चांगल्या नंबरने पास झाल्यावरच बरोबर दोन वर्षांनी. तोपर्यंत मी आता तुमची रजा घेतो. असं म्हणत... सर निघून जातात."

दोन वर्षांचा काळ लोटलेला असतो आणि मानसीचा बारावीचा निकाल लागतो आणि ती संपूर्ण कॉलेजमध्ये आणि तालुक्यात पहिला क्रमांक मिळवते. तसेच जिल्ह्यातही पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेली असते. रिझल्ट घेऊन अतिशय आनंदात मानसी घरी येते आणि आई–बाबांना आवाज देते

''आई–बाबा, गे आई... ओ

बाबाआआ, ओ बाबा, लवकर भायर येया”.

“अगो काय झाला, पास झालंय मा”.

“हो मिया पास झालंय आणि तुमका म्हायती हा माझो फक्त तालुक्यातच पहिलो नंबर नाय तर पण जिल्ह्यातपण पहिलो नंबर इलो.”

बाबांना खूप आनंद होतो,पुढे येत,

“माझा बाय ता, आमचा नाव काढलंय पोरा. (आईला उद्देशून) अगो बघतंय काय? तेची नजर काढ आणि साखर हाड आणि पोराचा त्वांड गॉड कर.”

“होयतर थांबा हा” आई धावत घरात जाऊन खोबऱ्याची कापा आणते आणि पोरीला भरवते. मानसी एक आपल्या हातात घेऊन बाबांना आणि आईला भरवते. अहो माका म्हायती होता चेडू पास होतला ता म्हणान मिया रात्रीच करून ठेयललय साखरेची कापा. चार नारळ किसून केलंय कापा. वाटा सगळ्यांका.

“मास्तरांका सांगलय की नाय ही गॉड बातमी. तेंचो तितकोच हक्क आसा या मोठ्या यशात. तेंका इसरान चलाचा नाय”, बाबा मानसीला विचारतात तेवढ्यात सर त्यांच्या घरी येतात आणि म्हणतात,

“तुम्ही भले विसराल ओ पण मी थोडीच विसरू देणार तुम्हाला. मी तुम्हाला दहावीच्या निकालादिवशी सांगितलं होतं की, मानसी बारावी पास झाली की मी तुमच्या घरी जेवायला येईन. चला आज मानसीने आपला शब्द पाळला. मग मी भला कसा विसरेन. मला निकाल कळाला तसा तातडीने इकडे आलो”

“होयतर, आम्ही खय नाय म्हणतो. (आईला) गो चल लवकर जेवणाची तयारी कर आणि ता घुडातला तलाग आसा ता काप आणि मस्त रससो कर. पावसपन लागता भायर थंड. आजच गटारी करया, श्रावण लागाग येळ आसा. आई त्यांना होकार देत घरात जाते,” सोमता तयारेक लागतंय त्येच्याआधी मास्तरांका गॉड भरवया. तेंच्यानी पुढाकार घेतलो नसतो तर आमकां ह्यो दिवस बघुक गावलो नसतो”.

“अहो काकी, अजून खूप काही बघायचं तुम्हाला. पत्रकार येतील आता तुमच्या घरी थोड्या वेळातच. तुमच्या मुलीच्या मुलाखती घेतील, पेपरमध्ये बातम्या येतील, सगळ्यांच्या तोंडी आता तुमच्या मुलीचंच नाव असेल आता. तुमच्याही मुलाखती घेतील पत्रकार तेव्हा काय काय बोलणार ते ठरवायचं म्हणून कल्पना द्यायला मी आलोय

पुढे. तुम्हाला कल्पना नाही, आज तुमच्या मुलीने केवढं मोठं यश प्राप्त केलंय. फक्त तुमच्यासाठी नाहीतर संपूर्ण तालुक्यासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे ही. संपूर्ण जिल्ह्यात पहिल्या तीन क्रमांकावर येणारी आपल्या तालुक्यातील मानसी ही पहिलीच मुलगी आहे."



हे बोलत असतानाच तेवढ्यात पत्रकार अजय मुळीक येतात आणि नमस्कार करतात आणि अभिनंदन करतात.

"अभिनंदन काका–काकी आणि मानसी तुझंही अभिनंदन, तू आपल्या तालुक्यातील पहिली मुलगी आहेस जी संपूर्ण जिल्ह्यात पहिल्या क्रमांकाने पास झालीस. कसं वाटतंय तुला आज हे यश मिळाल्यानंतर? तू याचे श्रेय कोणाला देशील?"

मानसी धन्यवाद देते आणि म्हणते,

"मला खरंतर काही सुचत नाही आहे तुम्ही पत्रकारमित्र आज असे माझ्या घरी आलात आणि माझी मुलाखत घेताय. खरं सांगायचं तर खूप भारी वाटतंय आज. मी हे यश माझ्या आईवडिलांना समर्पित करते. त्यांच्यामुळेच मी आज हे एवढं मोठं यश संपादीत करू शकले. त्यांनी जर का मला अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन दिले नसते तर कदाचित मी आज इथे नसते. त्यानंतर ज्यांच्यामुळे मी कॉलेज बघू शकले, दोन वर्षे शिक्षण पूर्ण करू शकले ते आमच्या हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. मेस्त्री सर यांचे, त्याचबरोबर आमच्या कॉलेजच्या प्राध्यापिका सौ. राऊळ मॅडम यांचे, ज्यांनी मला कधी कॉलेजमध्ये एकटं पडू दिलं नाही. आईसारख्या माझ्यावर लक्ष ठेवून असायच्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तर मी व्यवस्थित अभ्यास पूर्ण करू शकले. त्याचप्रमाणे माझे इतर गुरुजनवर्ग ज्यांनी आम्हाला खूप छानपैकी शिकवलं, आमच्या प्रत्येक शंकेची समाधानकारक उत्तरे दिली, १००% तयारी

करून घेतली आमची".

"खूप छान. यापुढे शिकून काय व्हायचंय तुला? कोणत्या क्षेत्रात जाणार आहेस तू?"

तेवढ्यात एक स्थानिक राजकीय पुढारी येतात आणि सांगू लागतात,

"कुठे म्हणजे काय? डॉक्टर होणार आपली मानसी. मी आताच मुख्यमंत्री साहेबांशी बोललो. त्यांनी हिच्या शिक्षणाचा सर्व खर्च करायचं कबूल केलंय. मानसी डॉक्टरच होणार, ....डॉक्टर मानसी.... कसं भारी वाटतंय ना. आपल्या गावातली पहिली मुलगी जी डॉक्टर होणार आहे."

तेवढ्यात मानसीचा लहान भाऊ सांगतो, "ताई तू इंजीनिअर हो, खूप मोठा पगार मिळू शकतो तुला. तुझ्या हाताखाली तीस-चाळीस लोक असतील काम करणारी. स्वतंत्र केबिन असेल बसायला. फक्त ऑर्डर सोडायची की पाहिजे ते समोर येईल".

त्यावर बाबा बोलतात, "काय नको डॉक्टर-बिक्टर आणि इंजीनियर. खयतरी धा-वीस हजाराची नोकरी बघ आणि कामाक जा आणि सांच्याक येवन घरातल्या कामात आवशिक वायच हात दी. घरचे रीती भाती समजान घे,जेवान करूक शिक, उद्या सकाळी लग्नाक उभ्या रवलंय तर कायेक शिकवक नाय हुनान तुज्या आवशिक कोणी बोलाक नको. आता बाये तुका फुढे शिकवक आमकां घोपान नाय हा. दोन वर्षा तुझी वढाताण बघली आम्ही."

एवढा वेळ शांतपणे सगळ्यांच ऐकत असलेले मानसीचे शिक्षक बोलतात,

"मला वाटत तिला ठरवूद्या काय करायचं ते. आता ती एवढी समजूतदार झालीय की कोणत्या क्षेत्रात करियर करायचं ते तिला निवडता येऊ शकेल किंवा अजून काही करायचं असेल तर ते ती नक्कीच ठरवू शकते. बोल मानसी तुला काय व्हायचंय"

"सर धन्यवाद, पण खरं सांगू मला नाही बनायचं डॉक्टर, इंजिनीअर किंवा अजून काही आणि नुसती कोणतीही खाजगी नोकरी करून माझं ज्ञान व्यर्थ होऊ द्यायचं आणि तुम्ही सगळ्यांनी मिळून मला इथपर्यंत शिकवलं ते असंच वाया घालू नाही द्यायचं" (बाबांना हाताला धरून समोर आणते आणि खुर्चीवर बसवते) सर मला माझ्या बाबांसारखं व्हायचंय. (बाबांचे तळपाय हातात घेते आणि आपल्या ओढणीने हळुवार

पुसते) आज ह्यांचे पाय बघा कसे झालेत ते. त्यांनी वर्षभर नीट चप्पलही नाही घातली पायात, की अंगावर पूर्ण कपडे. आई घर नीटनेटके ठेवायची, आम्हा सगळ्यांना वेळेवर सगळं मिळत की नाही ते बघायची परंतु या घराला बाहेरून संरक्षीत ठेवण्याचं काम बाबा करत आलेत. त्याचबरोबर स्वत:ची परिस्थिती नसताना त्यांनी आपली शेती सांभाळली, पुरेसं पीक येत नसताना, नुकसान



सहन करून दरवर्षी आपल्या मातेसमान धरणीची मशागत केली, लोकं जमिनी परप्रांतीयांना विकत असताना बाबांनी आपली जमीन फक्त शाबूत नाही ठेवली तर तिची मशागत करत राहिले. मला त्यांचं हे स्वप्न पुढे न्यायचं आहे."

सर अवाक होऊन बघतात आणि विचारतात, "म्हणजे नक्की काय करणार आहेस तू. शिक्षण सोडून तू आता शेती करणार आहेस का? अगं तुला माहीत आहे आणि तू बघतेस ना शेती करून किती पीक येतं, काय फायदा होतो ते. दरवर्षी फक्त यावर्षी तरी फायदा होईल या आशेवर शेती करायचं बंद नाही करत ते. पण त्याचा किती त्रास होतो त्यांना हे माझ्यापेक्षा तू जवळून बघितलं आहेस मानसी".

"हो सर आणि तोच त्रास मला बंद करायचा आहे. फक्त माझे बाबाच नाही असे कितीतरी शेतकरी आहेत जे याच आशेवर शेती करतात की निसर्ग त्यांच्यावर कृपादृष्टी करेल आणि यावर्षी तरी चांगलं पीक येईल आणि हो सर, तुम्ही बरोबर ओळखलंत मी शेतकरी होणार, जशी एका डॉक्टरची मुलगी डॉक्टर, एका इंजिनीयरची मुलगी इंजिनीयर, एक मोठ्या

बिझनेसमनची मुलगी त्याचा बिझिनेस सांभाळते तसंच मीही माझ्या शेतकरी बाबांची मुलगी शेतकरी होणार, त्यांचा परंपरागत शेतीचा व्यवसाय मी सांभाळणार" उपस्थित असलेल्या पुढाऱ्याला हे मान्य होत नाही. ते बोलू लागतात की, "मानसी बाळा अगं ह्या जमिनीत आता जास्त पीक नाही येणार गं, उगाच तू तुझा वेळ, मेहनत, बुद्धी आणि पैसा वाया घालवणार. तू मेडिकलला प्रवेश घे, मी आमच्या पक्षातर्फे तुला संपूर्ण मदत मिळवून देईन. आमदार साहेबांचं मेडिकल कॉलेज आहे तिथे तुला ॲडमिशन मिळवून देण्याची जबाबदारी माझी. तू मोठी डॉक्टर झालीस की आम्हालाही अभिमान वाटेल ना, आमच्या गावाचं नाव होईल".

"धन्यवाद काका, पण मी आधीच सांगितलं ना की मला नाही व्हायचं डॉक्टर आणि मला खरंच नकोय आर्थिक मदत माझ्या पुढील शिक्षणासाठी, शिक्षण पूर्ण करायचं असेलच तर मी माझ्या मेरीटवर शिष्यवृत्ती मिळवून मी माझं पुढील शिक्षण पूर्ण करणार. तुम्हाला खरंच मदत करावीशी वाटत असेल तर मग आपल्या गावातील गरीब शेतकऱ्यांना करा. मला डॉक्टर इंजिनीयर बनविण्यासाठी आपला पैसा नका खर्च करू. मी ठरवलंय की मी शेतकरीच होणार.

सर तिला पुन्हा समजवण्याचा प्रयत्न करू लागतात, "मानसी तू शेतकरी होणार म्हणजे तू शिक्षण अर्धवट सोडून पुन्हा शेती करणार आहेस".

त्यावर मानसी पटकन म्हणते, "मी कुठे म्हणाले की मी शिक्षण अर्धवट सोडणार म्हणून? मी माझं शिक्षण पूर्ण करून मग शेती करणार आहे".

"ते समजलं पण म्हणजे तू फक्त पदवीधर होणार आहेस तर. सध्याच्या घडीला बी एस्सीला नाही गं महत्त्व राहिलंय तेवढं. बी एस्सी, बी कॉम तर सहस्त्र होतात मुलं आता आणि मग नोकरी नाही म्हणून किंवा कोणत्या तरी साध्या कंपनीत नोकरी करत पडून राहतात. तुझ्या सारख्या मुलीने एखाद्या विषयात स्पेशलायझेशन केलं पाहिजे. माफ कर मला, नाहीतर तू म्हणशील ह्या सगळ्यांसारखं मीही तुला फोर्स करतोय; परंतु तुझी खरी पात्रता एखादी उत्कृष्ट डॉक्टर किंवा मोठी इंजिनीयर होण्याचीच आहे. मी माझ्या कुवतीनुसार तुला समजविण्याचा प्रयत्न केला आता सर्वस्वी निर्णय तुझाच आहे."

मानसीला खूप वाईट वाटतं सर असं बोलतात ते

बघून, "सर काय हे, तुम्ही माफी कसली मागताय. तुम्हीच तर आम्हाला शिकवलंय ना, की जे तुमच्या मनाला वाटतंय ते बोलावं, करावं आणि मला कल्पना आहे की तुम्ही सर्वजण माझ्या भल्यासाठीच बोलताय, माझ्या उज्ज्वल भविष्यासाठी मला सल्ला देतात, पण जे करायची मला अजिबात इच्छा नाही ते मी का करू? तसंही तुम्हाला कोणी सांगितलं की, मी फक्त बीएस्सी करून घरी बसणार आहे? म्हणून तुम्ही सांगता त्याप्रमाणे मीपण एका विषयात प्रावीण्य मिळविणार आहे आणि ते म्हणजे शेती. सर मी कोकण कृषीविद्यापीठात प्रवेश घेण्याचं ठरवलंय"

"अरे वाह खूप छान. किती घाबरवलंस पोरी गुरूला".

बाबा काहीच न समजल्याने बोलू लागतात, "अहो मास्तरानू आता कृषीविद्यापीठात काय असता? थय तरवो लावक शिकयतत काय? आणि नांगर धरूक, भात कापूक, भात झोडूक शिकयतले काय? "

"हो काका आणि त्यापुढे जाऊन पण तिथे खूप काही शिकवलं जाईल आणि त्याचा वापर करून तुमचं शेतीतील उत्पन्न नक्की वाढवू शकता तुम्ही. पण मानसी हे तुझ्या डोक्यात कसं काय आलं? " सर मानसीला विचारू लागतात.

"सर याची तयारी मी आधीपासूनच केली होती. खरंतर गुण वाढावेत म्हणून मला कोणीतरी अकरावी-बारावीला हॉर्टीकल्चर म्हणजेच उद्यानविद्या विषय घे म्हणून सुचवलं होता. परंतु हळूहळू मला ह्या विषयातील गोडी वाढू लागली आणि कळालं की आपण आपल्या शेतीसाठी खूप काही करू शकतो. आपल्या पारंपारीक शेतीला जर आधुनिकतेची जोड लाभली तर खूप मोठी क्रांती घडू शकते. मध्यंतरी कोकण कृषीविद्यापीठ, दापोली येथून काही विद्यार्थी त्यांच्या अभ्यासक्रमातील एक भाग म्हणून आपल्या गावात प्रात्यक्षिके देण्यासाठी आले होते आणि त्यांच्याशी बोलताना मला जाणवलं की, बीएस्सी हॉर्टीकल्चरमध्ये खूप मोठा स्कोप आहे. फक्त मोठी नोकरी मिळेल म्हणून पदवी मिळविणे हे माझं कधीच ध्येय नसणार सर, मला माझ्या बाबांसाठी, आपल्या गावासाठी काहीतरी करायचं. "

सर कौतुकाने म्हणतात, "वाहव्वा, खरंच खूप छान कल्पना आहे. आम्ही ह्याचा कधी विचारच नाही केलेला. तुझी निवड नक्कीच

स्वागतार्ह आहे आणि मी शब्द देतो की, तुला तुझ्या शिक्षणादरम्यान कोणतीही मदत लागली तर मी नेहमी तुझ्या सोबत असेल. यशस्वी हो.”

आता त्या पुढाऱ्यालासुद्धा कळून चुकतं, “अगदी खरंय पोरी. ह्या गोष्टींकडे आम्ही कधी बघीतलंच नव्हतं. आम्हाला फक्त पदवीधर म्हणजे बीए, बीकॉम, बीएस्सी, नाहीतर डॉक्टर–इंजीनियर, सीए एवढंच माहिती होतं. शेती म्हणजे पारंपरिक शेती आणि त्याला नैसर्गिक हवामानाचा फटका बसून होणारं नुकसान बघता कोणी शेतीकडे वळत नाहीत, त्यामुळे कित्येक एकर जमिनी ओसाड पडल्यात. परंतु पारंपरिक बरोबर आधुनिक शेती करून आपण आपला आर्थिक स्तर उंचावू शकतो ह्याचा आम्ही कधी विचारच नाही केला. तुला गावाच्या भल्यासाठी काही करत असताना, तुझं स्वप्न पूर्ण करत असताना कोणतीही आर्थिक गरज लागली तर मला हाक मार, तुला मदत मिळवून देण्यासाठी मी तत्पर असेन”

“सर, मला माझ्या शिक्षणाची काळजीच नाही आहे. आमच्या कॉलेजच्या प्राध्यापकांनी



तिकडे विद्यापीठाच्या प्राचार्यांशी सगळं बोलणं करून व्यवस्था केलेली आहे. आनंदाची बाब म्हणजे मला १००% शिष्यवृत्ती मिळणार आहे. तिकडे माझी हॉस्टेलमध्ये राहायची व्यवस्था झालीय”.

“ओहह हे तर मस्तच झालंय. शिवाजी सावंत विद्यापीठ खरंच हिऱ्यांना पैलू पाडण्याचे काम करत असताना निसर्ग वाचविण्यासाठी मुलांना संस्कारित करत असतात”

“नक्कीच सर. मी त्या विद्यापीठाची माहिती मिळवली आणि मग निर्णय घेतला. मला माझ्या शिक्षणाची आता चिंताच नाही. मला तुम्हा सगळ्यांची खरी गरज लागणार आहे ती माझं शिक्षण पूर्ण झाल्यावर. मला आपल्या शेतात विविध प्रयोग करताना काही आर्थिक मदतीची

गरज लागू शकते तेव्हा मात्र तुमच्या पाठिंब्याची आवश्यकता असेल. कारण मी आर्थिक बाबतीत कमी पडू शकते आणि तुम्ही माझ्यासोबत असणार म्हणजे मला पुढची काहीच चिंता नाही. आता मी जास्त जोमाने अभ्यास करू शकेन. कारण आता माझी जबाबदारी अजून वाढलीय आणि मी तुमच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. आई–बाबा, आशीर्वाद द्या मला."

ह्या सगळ्यांत एका बाजूला राहून ऐकत असलेल्या माउलीचे डोळे भरून येतात,

"पोरा, तिया थडे इतक्या लांब एकटा रवतलय? तिया खातलय काय? तुका नजा झाला तर डॉक्टर कडे कोण नेतला? आमची आठवण एवची नाय तुका?"

"अगे आई, तुमची आठवण एवची नाय असा कसा होयत. तुमीच तर माझा आयुष्य आसात आणि तुका म्हायती हा , मी वर्षभर जेवान करूक कित्या शिका होतंय, लगीन करूचा हा म्हणान नाय तर मी थय हॉस्टेलमध्ये गेलंय काय स्वताच्या हातानं जेवान करून जेवचा लागतला म्हणान. मिया आता बऱ्यापैकी जेवाण करतय हेची खात्री आसा मा तुझी मगे आता माझ्या जेवणाची काळजी करू नको आणि मी इतको मोठो निर्णय घेतलंय तो तुमच्या सगळ्यांसाठीच ना. बघ आई, मिया नाय गेलंय शिकाक म्हणान जास्त काय होवचा नाय, तसो काय फरक पडाचो नाय. जसा आता चल्लाहा तसाच चलत रवतला. नुकसान जा होता तसाच होतला पण फायदो काय होवचो नाय ह्या मात्र नक्की. पण समजा मिया थय लांब शिकाक गेलंय, नीट शिकान ईलय, अनुभव घेतलय तर मगे त्या शिक्षणाचो वापर करून जा नुकसान होता ता कमी करूचो प्रयत्न करू शकतो आणि आपलो फायदो वाढोक शकता"

"होय गो पोरा, माका वाटला लगीन झाल्यार आवशी–बापाशीक कोणी नावा ठेवक नको म्हनान तिया चुलीकडे येतंय. पण नीट काय ता जीव सांभाळून कर".

सर खूश होत म्हणतात, "चला आता आईने परवानगी दिलेली आहे आता फक्त सुप्रीम कोर्ट म्हणजेच बाबांच्या निर्णयाची प्रतीक्षा आहे. मला वाटतं एवढं सगळं ऐकल्यानंतर सुप्रीम कोर्ट सकारात्मक निर्णय देईल".

बाबांना पण आपल्या मुलीचा अभिमान वाटतो. आपल्या मुलीने घेतलेला चांगला निर्णय

बघून छान वाटतं.

"आता तुमी सगळ्यांनी इतक्या सगळा सांगल्यार, पोरीन सगळी तयारी केल्यार मिया बापडो कोण अडयतलंय आता. पण मास्तरानू तुमी एकदा नीट चौकशी करा आणि मगे काय तो फॉर्म भरा. आम्ही अडाणी माणसा, धड याक बुक शिकाक नाय, तेवा आमका काय कळणा नाय तेतला. आम्ही सकाळी शाळेत गेलो आणि दुपारी शाळा सोडली ता परत शाळेचा तोंड बघूक नाय. तुमी बघा आणि मगे काय ता ठरेया. तुमच्यार पुरो इश्वास आसा आमचो."

सर त्यांना खात्री देतात की,

"हो, नक्की. आता माझ्या माहितीनुसार ती जिथे जाणार आहे ते एक प्रतिष्ठित कॉलेज आहे आणि तिथली शिस्त खूप कडक आहे. फक्त मी बाकीची व्यवस्था केलीय ती बरोबर आहे ती चौकशी करतो आणि मग फॉर्म भरू आपण. उगाच तिथे गेल्यावर काही त्रास नको व्हायला. चला मानसी मॅडम पुनःश्च एकदा अभिनंदन आपले आणि पुढील यशस्वी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा. हा यशस्वितेचा आलेख असाच उंचावत राहिला पाहिजे. तिथे हॉस्टेल राहायला गेल्यावर वेगवेगळ्या प्रकारची संगत लागू शकते, घरचे कोणी रोज सोबत नसणार कॉलेज संपल्यावर तेव्हा भान ठेवून वेळेवर घरी येऊन आपला अभ्यास वेळेत करायचा".

"१००% सर. तुम्हाला आठवतं का सर तुम्ही मला एक सल्ला दिला होता मी दहावी उत्तीर्ण झालेली तेव्हा; की "मानसी तू तुझी पायरी ओळखून चाललीस की कधी ठेचही नाही लागणार आणि अडखळूनही पडणार नाही." ते कायम माझ्या स्मरणात राहिलंय, मला माझी पायरी माहिती आहे आणि त्यापेक्षा माझ्या बाबांची पावले कायम माझ्या डोळ्यांसमोर राहतील. आमच्या शिक्षणासाठी त्यांनी झिजवलेली पावले त्याला आलेले फोड वेळोवेळी मला माझ्या पायरीची आठवण करून देत राहतील"

"हो गं बाळा, माझी खात्री आहे. परंतु तू तिथल्या वातावरणात जाऊन भरकटून जाऊ नयेस म्हणून मी तुला वारंवार आठवण करून देत राहतोय बस एवढंच. राग मानू नकोस"

मानसी हात जोडून नमस्कार करत बोलते,

"नाही सर राग नाही. उलट तुम्ही जसे अधिकाराने सांगताय ते ऐकून मला अजून बळ

येतंय. तुमचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत”

पत्रकार अजय पुन्हा एकदा अभिनंदन करून शुभेच्छा देतात, “मानसी, आमच्या चॅनेलकडून सुद्धा तुला खूप खूप शुभेच्छा. खुप वेगळा आणि धाडसी निर्णय घेतला आहेस तू आणि पुढे जाऊन नक्की काय व्हायचं हे ठामपणे ठरवलं की यश हमखास मिळतं याची खात्री आहे. यशवंत हो ....कीर्तीवंत हो....”

सगळेजण पुन्हा एकदा अभिनंदन करून मानसीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देतात.




## चारोळ्या

**संसार**

संसार म्हणजे तडजोड असते
दुसरे तिसरे काहीच नसते
एकमेकांना आधार देऊन
आयुष्यभराची सोबत असते

**स्वत:चे घर**

आयुष्यात जगतांना घरातही स्वत:चे घर असावे
उघडण्यासाठी कुणालाही त्यास मुक्तद्वार नसावे
हसावे “मनसोक्त” नाचावे मनास वाट्टेल ते करावे
आयुष्य स्वत:चे क्षणभर तरी स्वत:साठी जगावे

-प्रा.अरुण सुका पाटील

## वास्तुटीप्स

### सेप्टिक टँक

१)सेप्टिक टँक नेहमी पश्चिम व वायव्य भागात पाहिजे.

२)टँक म्हणजे खड्डा. खड्डा पूर्ण भरलेला असतो. सूर्याची किरणं पडतात तेव्हा त्याचा दूषित भाग स्वच्छ करण्याचं काम इन्फ्रारेड किरणं करतात.

३)पूर्व, उत्तर, ईशान्य भागात जर tank आला तर आरोग्याच्या तक्रारी वाढतात. Health Problem वाढतात. पैशाचा Problem होतो. मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो. मुलांचा ग्राफ खाली घसरत जातो, अवाढव्य खर्च, कोणी कोणालाच जुमानणार नाही. अपघात होणार.

४)ब्रह्मस्थानात पाण्याची टाकी आली तर आत्महत्या, अपघात, संकटाची मालिका चालू राहणार.



# ओम पब्लिकेशन

- इन्फो डायरी (वैविधपूर्ण माहिती संकलन)
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- जल - आशय (महाराष्ट्रातील धरण, पाटबंधारे, जल संधारण, जल विद्युत अर्थातच संपूर्ण पणे पाणी या विषयाला वाहिलेला ग्रंथ.)
  लेखक - राघवेंद्र कुलकर्णी आणि डॉ. विलास ज. पवार
- कल्पतरु युवा - युवा पिढीसाठी दिवाळी अंक
- सुरक्षा अभियान - सुरक्षा या विषयाला वाहिलेले वार्षिक
- सखी संवादिका - फक्त महिलांसाठी दिवाळी अंक
  संपादक - विशाखा पवार
- श्री - गणेश पूजा आणि आरती संग्रह
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- श्री लक्ष्मीपूजन - श्री लक्ष्मी, कुबेर पूजा आणि कथा, मंत्र संग्रह
- ड्रिंक्स अॅन्ड डाइन -मिनी कॉफी टेबल बुक (मराठी आणि इंग्रजी)

दिवाळी अंकाच्या संपादनासाठी सहाय्य
कथा/कविता/कांदबरी/आत्मचरित्र इत्यादी पुस्तकांच्या
प्रकाशनासाठी सक्रिय मार्गदर्शन

सर्पक

एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- २५३६४१४१

E-mail : vilaspawar@ompublication.com

SAFETY FOR ALL
ALL FOR SAFETY

सुरक्षाविषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था

# सुरक्षा अभियान

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

**रस्ता सुरक्षेविषयक कार्य करण्याच्या रस्ता सुरक्षा व अन्य सुरक्षाविषयी बाबत जाणून घ्यायचे असेल व या क्षेत्रात कार्य करायचे असेल तर संपर्क साधावा :**

संस्थापक / अध्यक्ष

**डॉ. विलास ज. पवार**

ऑफिस : एम - ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) -४०० ६०२
०२२-२५३६४१४१ / ९८२११६१६६२

# विवाहबंधन

- पुष्पा लंकेश्वर

**आई म्हणाली बाळा तुझा विवाह झाला, तुला मुल झाली तरी तू मला लहानच राहशील. पण आता आमचे वय वाढत चाललीत तेव्हा तू विचार कर बरं वडील मायलेकी चा संवाद ऐकत होते व मुलीच्या विचारांवर अधिक खूश होत होते.**

आई-वडिलांची मी एकुलती एक. माझे वडिल -आई हे माझे नेहमीच प्रायरटी राहिले त्यामुळे मला मिळणारा जोडीदार हा त्यांना व मला सांभाळणारा असावा. त्याची पत्रिका जुळेलही, पण त्याचा स्वभाव माझ्या स्वभावाशी जुळेल का? हे महत्त्वाचे आहे.

या जाहिरातीवरून खरोखर मुलींच्या बाबतीत विवाहाबाबत अनेक समस्या निर्माण होतात. वरील ॲडप्रमाणे प्रत्येक मुलीचे हेच स्वप्न आहे. मुलगी कितीही शिकलेली असो किंवा उच्च पदावर कार्यरत असो, तिला विवाह या गहन प्रश्नाला सामोरे जावे लागते. विवाह न करावा तर समाज काय म्हणेल हा यक्षप्रश्न सर्व थरातील व्यक्ती, जाती, धर्म यांनी विवाह या गोष्टीला अनन्य साधारण महत्त्व दिले आहे. वनिता ही आईवडिलांची एकुलती एक कन्या. वडील नोकरी करून घराचा सर्व भार सांभाळायची. वनिताची आईदेखील पदवीधर झालेली, पण घरात वयोवृद्ध सासू-सासरे यांचे पहावे लागणार म्हणून नोकरीस फाटा दिला, मुलीला मात्र चांगले उच्च शिक्षण देण्याचा आईवडिलानी चंग बांधला होता. घरातील नात्यातील सर्व म्हणायचे 'अहो मुलीच्या जातीला कशाला फार शिकवायचे'? लग्न करून ती परक्याचच धन होणार ना वनिताचा विवाह

चांगल्या नोकरदाराशीं चांगल्या बागायतदाराशी करून संसार करू द्यावा' असे नातेवाईकांचे म्हणणे असायचे. पण वनिताच्या वडिलांना हे मान्य नव्हते. माझ्या मुलीला खूप खूप चांगले शिक्षण देऊन स्पर्धा परीक्षांना बसविणार. त्यात यश मिळवून ती मोठ्या पदावर अधिकारी होणार असे ते मुलीच्या मनावर बिंबवत रहायचे. वनिताने वडिलांच्या स्वप्नाप्रमाणे एम.पी.एससीची परीक्षा प्रत्येक स्पर्धा परीक्षा देण्याची तयारी ठेवली.



ध्येयवादी माणसांना अनेक संकटेही येतात पण उशिरा का होईना यश प्राप्त होतच असते. वडिलांचे ध्येय, आईचा सपोर्ट यामुळे वनिताही जिद्दीला पेटली. तिने उच्च पदावर आरूढ होण्याचा ध्यासच घेतला. ग्रामीण भागात मुलीने तिशी ओलांडली की, घरापेक्षा बाहेरील लोकांचीच टोचणी सुरू होते की आता लग्नाचं वय झालं वनिता तू लग्न कर आणि संसाराला लाग पाहू, असे आजूबाजूला असलेल्या वृद्ध आजी म्हणायच्या. वनिता त्यांना योग्य उत्तर देत असे. प्रत्येक स्त्रिला जोडीदार असणे हे एक सामाजिक बंधन पूर्वापार चालत आले आहे. पूर्वी स्त्रिला शिक्षण घेणे तर कठीणच, पण स्वनिर्णय घेणे लांबचीच गोष्ट होती. आता मात्र काळ बदलला आहे. मुलीला मुलाप्रमाणे स्वनिर्णय घेण्याची परवानगी मिळते आहे. वनितानेही ठरवले की, आईवडील याच्या सहाय्याने स्व:निर्णयावर ठाम रहायचे. तिने शिक्षणावर व आपल्या करिअरवर अधिक भर दिला. त्यामुळे तिच्या श्रमाचे तिला योग्य फळ मिळाले. तिने कलेक्टरच्या परीक्षेत यश संपादन केल. वडिलांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होऊ


लागले. तिच्या तालुक्यात जिल्ह्यात सर्वच तिचा सत्कार झाला. जिल्ह्यातील विकास कामाबरोबरच ग्रामीण भागांतील सुविधांवर तिने अधिक भर दिला.

वनिता समाजात जसजशी कामानिमित्त वावरू लागली तसतशी तिच्या कामाची छाप जनमानसात पडू लागली. तिला आपल्या कुठल्याच गोष्टींचा गर्व नव्हता. ती करारी, धाडसी, दिल्या वचनाला चोख रहाणारी असल्याने कोठे न डगमगता तिचे कार्य व्यवस्थित पार पडू लागले. वर्षामागून वर्ष जाऊ लागले. आता वनिताच्या आईलाच तिच्या विवाहाची उत्सुकता निर्माण झाली. तिने आपले मन वनिताच्या वडिलांजवळ मोकळे केले. त्याना हा विषय वनिताजवळ काढायचाच होता. वनिताला तिच्या कामाच्या दौऱ्या मुळे एकदिवसही मोकळा वेळ मिळत नसे. आई डोळ्यांत तेल घालून तिच्या निवांतपणाची वाट पहायची, वनिताला आईने तिच्या लग्नाबद्दल विचारले, पण वनिताने आईशी लाडीकपणे संवाद साधला की, आई तुला मी अजून लहानच आहे ना जेव्हा मी मनापासून मोठी होईन ना तेव्हा भी स्वःताहून सांगेल आता आई मला विवाह करायचा आहे. आई म्हणाली बाळा तुझा विवाह झाला, तुला



मुलं झाली तरी तू मला लहानच राहशील. पण आता आमचे वयं वाढत चाललीत तेव्हा तू विचार कर बरं. वडील मायलेकी चा संवाद ऐकत होते व मुलीच्या विचारांवर अधिक खूश होत होते. जगात आपण अनेक मुले-मुली कामानिमित्त मित्र-मैत्रिणीच्या नात्याने वावरत असतात. त्यातून अनेक अघटित प्रकार घडत असतात, चांगला मित्र किंवा चांगली मैत्रीण म्हणून ते एकमेकांशी चांगले वागू लागतात. अल्लड वयात मुला–मुलींना कधी कधी मित्र मैत्रिणींचा सहवास घातकही ठरू शकतो.

याच गोष्टी पेपरमध्ये वाचून किंवा टीव्ही वर पाहून वनिताच्या आईला आपल्या मुलीची अधिकच काळजी वाटायची तिचा जीव खूपच कासाविस व्हायचा. तिला वाटायचे काळाच्या ओघात आपली मुलगी जर कुठे वाट चुकली तर असा प्रश्न भेडसावयाचा मग ती आपल्या पती ला बोलून दाखवायची.



वनिताचे वडील विचारवंत ज्ञानी असल्याने त्यांचा त्यांच्या मुलीवर पूर्ण विश्वास होता. त्यांनी मुलीच्या आईला सांगितले की, आपली वनिता चांगल्या संस्कारातली आहे. ती कधी वाममार्गाला जाणार नाही हा माझा शब्द राहील. ५ ते ६ दिवसांच्या भरघोस कामामुळे वनिता आता थोडी विसाव्याच्या आरामाची विचार करू लागली एक दिवशी सहज टीव्ही समोर बसली असता एक जाहिरात लागली. ती म्हणजे मी आई वडिलांची एकुलती एक. माझे आईवडील हे माझे नेहेमीच प्रायरीटी राहिले. त्यामुळे मला मिळणारा जोडीदारांची पत्रिका जुळेलही, पण त्याचा स्वभाव जुळेल का? ही जाहिरात संपली व क्षणात तिला तिच्या कामात सदैव मदत करणारा सुस्वभावी असा विशाल आठवला. नावाप्रमाणे विशाल मन असणारा तिला पूर्णपणे भावलेला असा त्याचा स्वभाव तिच्या स्वभावाशी जुळणारा होता. तिने लगेच बॅग भरली व ती घरी आली. थोडा निवांत वेळ पाहून तिने आई-वडिलांना विशालबद्दल सर्व माहिती दिली. विशालचे आईवडील सुशिक्षीत होते तेही मुलाच्या म्हणण्याप्रमाणेच त्याला स्वातंत्र्य देत होते. वनिताच्या वडिलांनी "शुभस्य शीघ्रम" असे म्हणून विशालला फोन लावला. त्याला वनिताबद्दल विचारणा केली. त्यानेही होकार दिला. अशाप्रकारे वनिताने सर्वांना धडा दिला की उशीराचे फळ चांगले असते.

वनिताच्या वडिलांनी विशालच्या वडिलाना फोन करून सर्व हकिकत सांगितली. विशालच्या वडिलांना (रामरावाना) खूपच आनंद

झाला विशालला भेटायला गेले असता त्यांना वनिताची सर्व माहिती मिळालीच होती. तिचा स्वभाव, शालीनता मोठ्यांचा आदर करणारी मुलगी आपली सून म्हणून त्यांनी मनोमन पसंत केलीच होती. वनिताच्या वडिलांना त्यांनी मुलगी पसंत आहे हे आनंदाने कळवले. वनिताच्या वडिलांना व आईला आकाश ठेंगणे वाटू लागले. आता मुलाकडील सर्व मंडळी औपचारिकता म्हणून मूलीच्या घरी आले. सर्व विधीवत पहाण्याचा कार्यक्रम आला. लग्नाचीही तारीख ठरली व योग्य तारखेला विशाल-वनिता विवाहबद्ध झाले. पुढील वैवाहिक जीवनात सुख शांतीची भरभराट होवो असा आशीर्वाद घेऊन ते आपल्या सुखी जीवनात रममाण झाले.

ह्या व अशा पद्धतीच्या विवाहाला खरा विवाह म्हणावास वाटतं. केवळ विवाह करून बंधनात रखडण्यापेक्षा स्वविचाराने, सर्वांसमवेत केलेला विवाह हा बंधन नसून, स्वछंदी पक्ष्याप्रमाणे आकाशात विहार करणारा असू शकतो.

## चारोळ्या

*सरस्वती पूज्य संपदेमधील*
*नव शब्दतार छेडते नित्य विणेतून*
*मराठमोळी संस्कृती जपण्यास*
*वैभवासवे करे वर्षाव समूहातून*

*शून्यालाही रडताना*
*पाहिले त्याच्याच रिंगणात*
*किंमत असली नसली तरीही*
*भावना दाटल्या होत्या मनात*

*नयनकमल तव भाव छेडती*
*अबोल प्रीत स्पंदने वाढती*
*यमुनातीरी गोपीकांसंगे*
*लपंडाव अन् रास खेळती*

*सावळा हरी हा राधेचा*
*गोकुळेतील कान्हा यशोदेचा*
*वासुदेव- देवकीचा तान्हा*
*नटखट सखा गोपीयांचा*

**- निशा शिंदे**

# टॉयलेट व बाथरूम

१) आंघोळ करताना चेहरा नेहमी उत्तरेला जाईल असे बसावे.

२) टॉयलेटला गेल्यावर चेहरा उत्तरेला गेला पाहिजे तसा Pot बसवावा.

३) जर उत्तर नाहीच मिळाली तर पूर्व दिशा.

४) टॉयलेट व बाथरूमच्या दरवाजावर नॉर्मल डिझाईन ठेवावी, चित्राचं combination करू नये.

उदा, जर आग्नेयला टॉयलेट आहे तर चित्र जर पाण्याचं लावलं तर अजून भडका होईल, त्याचा त्रास जीवनावर होतो.

५) म्हणून कलर, चित्र कसेही ठेवू नये. टॉयलेट पश्चिम वायव्येला तोंड (कचराकुंडी या भागात) ईशान्येला टॉयलेट नको. उत्तर-पूर्व ला बाथरूम चालेल.

# आपल्या घराची कचराकुंडी

१) दिवसभराचा कचरा जो आहे, तो पश्चिम व वायव्येच्या भागात ठेवावा.

२) कचरा अखंड २४ तास घराबाहेर ठेवावा म्हणजे पश्चिम किंवा वायव्येला पॅकबंद ठेवावा.

३) किचनच्या पश्चिम व वायव्य भागात आपल्या घरातील कचराकुंडी ठेवावी.

४) जर आपल्या घरातील एखादी वस्तू लवकरात लवकर जावी असं एखाद्याला वाटत असेल तर त्याने ती वस्तू संपूर्ण घराच्या वायव्य भागात ठेवावी. म्हणजे ती वस्तू हळूहळू बाहेर जाईल.



# दिवाळीच्या हर्षभरीत शुभेच्छा!

## ओम फिल्म

विविध विषयांवरच्या माहितीपटाची / लघुपटांची निर्मिती करणाऱ्या

आमच्या प्रोडक्शन हाऊस साठी :

स्क्रीप रायटर्स  निवेदक कलाकार  कॅमेरामन  पाहिजेत.

**संपर्क : निर्माता/दिग्दर्शक : डॉ. विलास पवार ९८२११६१६६२ /०२२-२५३६४१४१**

एम-३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४०० ६०२.

## ओम पब्लिकेशन

**आमच्या ओम पब्लिकेशनसाठी अनुवादक : इंग्रजी/मराठी पाहिजेत.**

**कथा/कविता/चारोळ्या/पाककृती या विषयांबरोबर अन्य विषयांच्या**

**पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी घेऊन त्यास सहाय्य करणार. यासाठी संपर्क साधावा.**

**ओम पब्लिकेशन, एम-३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४०० ६०२.**

**फोन : ९८२११६१६६२ /०२२-२५३६४१४१.**

For Crises management, Concept Marketing,
Media Management, Event Management, Public Relation &
Other Managing ability and Challenging Works.



Avidmedia
Management & marketing Pvt. Ltd.

**Contacts:**
022-25364141, Cell - 9167785599



# रस्सीखेच

- वैभव धनावडे

कालच दादा त्याच्या मित्रांना घेऊन पुण्यात आलेला, मुंबईत अधिवेशनासाठी जाणार होता. येण्याआधी मी चार मित्रांना घेऊन जेवायला येतोय असा कॉल केला. आला,जेवला आणि निघून गेला. आईला काय हवं काय नको एका शब्दाने विचारलं नाही.

रात्री दोनची वेळ, त्या चौघांचे किमान आठ ते नऊ पेग झाले असावेत. बराच वेळ हसणारा खेळणारा मंदार हळूहळू गप्प होऊ लागला. शंतनूला ही गोष्ट लक्षात यायला वेळ लागला नाही.

'काय झालं? गप्प का?' शंतनूने मंदारला प्रश्न केला.

आज बरेच वर्षाने चौघेपण एकमेकाला भेटत होते. तसे फोनवर बोलणे असायचे, पण नंतर संसार सुरू झाला आणि गाठीभेटी फक्त whatsapp ग्रुपवरच होत राहिल्या. एकमेकाला काही शुभेच्छा देणे कधी चिडवणे ह्या पलीकडे जातीने  विचारपूस करणे कमी होऊ लागलेले .

पण आज बरेच वर्षानंतर भेटून झालेला आनंद ते भरल्या पेल्यांतून साजरा करत होते.

'काही नाही, आपलं सहज.' मंदारने उत्तरं दिलं.

'काहीं नाही भैया ह्याला रडायची सवयच आहे', बाळ्या चिडवून म्हणाला.

ह्या वाक्यावर सगळे हसू लागले. पण मंदारचा चेहरा अधिकाधिक रडवेला होऊ लागला आणि नकळत डोळ्यांतील पाणी वाहून गालावर आले.

दिवाळीच्या

हार्दिक शुभेच्छा!



श्रीमती स्नेहा तावडे

श्रीमती प्रियांका थोरवे

कॉन्ट्रॅक्टर

सार्वजनिक बांधकाम मंडळ ठाणे

WITH BEST COMPLIMENTS FROM

CSS

**Mission & Vision**

**To create a cyber safe world**

**ACTIVITIES UNDERTAKEN**

- WORKSHOPS ON THE PREVENTION OF CYBER CRIME
- SEMINARS ON CYBER SAFETY
- GUIDANCE & SUPPORT TO VICTIMS
- PUBLICATIONS ON CYBER SECURITY
- TRAINING PROGRAMS FOR SAFE CYBER LIFE
- DISASTER MANAGEMENT
- AWARENESS CAMPAIGNS
- COLLABORATION WITH LAW ENFORCEMENT

Join our movement and make India a cyber safe country

www.cybersafesociety.org | +919167785599

HAPPY DIWALI

With warm wishes,

**President : Dr. Vilas Pawar    Secretary : Adv. Virat Vilas Pawar**

**M-3, Paradise Tower, Gokhale Road, Naupada,**
**Thane (W), Mumbai, Maharashtra 400602**

त्याला असा रडताना पाहून आता मात्र सगळ्यांची एका क्षणात उतरली.

'काय झालं?' अमितने मंदारला आता प्रेमाने विचारले.

ह्या एका प्रश्नाने जणू पाण्याच्या दबावाने धरणाच्या भिंती फुटाव्यात तसे झाले आणि मंदार ढसाढसा रडू लागला. इतके वर्ष साठवलेले आज बाहेर पडत होते. दारू फक्त निमित्ताला कारणीभूत ठरलेली.

अमितने जरावेळ जाऊ दिला. मंदारला थोडं रडू दिलं. भरला ढग कोसळून देणे कधी कधी गरजेचे असते. त्याच भरात समोर असलेला पूर्ण ग्लास एका घोटात मंदारने घशाखाली घातला आणि त्या जळजळत जाणाऱ्या दारू संगे एक हुंदका कमी होत गेला.


भैया लग्न होऊन चार वर्ष झाली. तरीही त्रास सुरूच आहे. मंदारने बोलणं सुरू केलं.

आई, बायको, मी आणि मुलगा इतकंच कुटुंब. मला आता प्रमोशन मिळालं आहे. मुलगा गुणी आहे असं असतानाही काही गोष्टी पाठ सोडत नाही आहेत. सकाळी ऑफिसला जा घरी आल्यावर कधी रडून झोपी गेलेली आई, तर कधी रागात असणारी बायको हे सांभाळण्यात जीव जातोय.

अरे पण वहिनी तर आईनेच बघितल्या ना?

तुमचं arange मॅरेज मग असं कसं? बाळ्याने प्रश्न केला. तुला भाऊ आहे मोठा त्याच्याकडे पाठव आईला काहीदिवस.

सुरवात तर तिथूनच झाली. बाबा गेले आणि आईने मोठे कष्ट करत आम्हाला मोठं केले. स्वतःची काळजी न करता आम्हाला हवं नको ते बघितलं. दादाचं लग्न करून दिलं, त्याला मुलगी



झाली. त्याची मुलगी आणि मी खूप छान नातं आहे. आपल्या मुलीसारखीच मी तिला मानत

आलोय. पहिल्या पगारातून तिला नेलेली खेळणी खाऊ मला अजून आठवतो. सगळं छान सुरवातीला सुरू होते आणि मग हळूहळू वहिनींच्या माहेरकडच्यांचा वावर वाढला. मी शिक्षणासाठी तेव्हा पुण्यात होतो. मला गावकडचं काहीच माहीत नव्हतं. आई सुरवातीला तिची स्वतःची कामं करायची स्वतःचे कपडे धुणे, काही हवं नको ते बनविणे करायची मग हळूहळू दादा वहिनीची कामेपण अंगावर पडू लागली. त्यांच्या कामांचं काही नव्हतं, पण माहेरच्या आलेल्या पाहुण्यांचे कपडे धुणे पर्यंत त्रास वाढू लागला. भाऊ सगळं डोळे मिटून बघत होता. मला ह्या सगळ्याची कल्पना नव्हती आणि एक दिवस आई चक्कर येऊन पडली असा फोन आला. मी तडक गावाला निघून गेलागेल्या तिला डॉक्टरकडे नेले. तो पर्यंत भाऊ वहिनींनी साधं डॉक्टरला बोलवले सुद्धा नव्हतं. हॉस्पिटल मध्ये नेल्यावर डॉक्टर म्हणाले की त्यांच्या मनावरचा ताण ह्या परिस्थितीला कारणीभूत आहे. तेव्हा खोदून खोदून विचारल्यावर सगळं समजलं. मंदारने झालेला प्रसंग डोळ्यांसमोर उभा केला.

बापरे, अरे मग भावाला काही बोलला का नाहीस? अमितने विचारलं.

भैया त्याच्या समोर सगळं घडत होते, तेव्हा एक शब्दाने तो काही बोलला नाही. मग नंतर बोलून काय करणार? आता सुद्धा पंधरा दिवसांपूर्वी आईचं ऑपरेशन झालं. दादाने एक फोन करून विचारलं नाही की कशी आहेस? सगळं मी बघणार होतो, मी खर्च करणार होतो पण त्याने फक्त विचारपूस करावी इतकीच माफक अपेक्षा होती.

कालच दादा त्याच्या मित्रांना घेऊन पुण्यात आलेला, मुंबईत अधिवेशनासाठी जाणार होता. येण्याआधी मी चार मित्रांना घेऊन जेवायला येतोय असा कॉल केला. आला,जेवला आणि निघून गेला. आईला काय हवं काय नको एका शब्दाने विचारलं नाही. मोठा मुलगा म्हणून काहीच कर्तव्य नाही का त्याचं?

दारूच्या नशेत म्हणा, मंदारचा इतका वर्षांचा आतून दाबलेला आवाज आता बोलका होत होता.

अरे जाऊदे, त्याने नाही बघितलं, तू बघितलं ते महत्त्वाचं. मोठेपण फक्त त्याच्याकडे नावाला राहूदे, तू मोठेपणा कामातून घे. आईचा सांभाळ कर आनंदाने. आम्ही त्याला समजवायचं

म्हणून सांगितलं.

तेच तर केले. परत आल्यावर आईच्या सांगण्यावरून आईला आवडलेल्या मुलीशी लग्न केले. म्हटलं नात्यातील असेल तर आईला व्यवस्थित बघेल, तिची काळजी घेईल. कमी शिकली असेल तरी चालेल पण माया ममता ह्यात कुठेही कमी पडणार नाही. घर आणि आई नीट



सांभाळेल.

पण इथे सुद्धा नशीब आडवं आलं. गावाकडची नात्यातील मुलगी शहरातील हवेने बिथरली आणि बिल्डिंगमध्ये कोणाचेच सासू सासरे सोबत राहत नाहीत इथंपर्यंत कधी पोहचली. ज्या आईने तिला हसत हसत स्वीकारलं, तिला आपलं मानलं आता तिच तिला अडचण वाटू लागली आहे. प्रायव्हसीचे स्पेलिंग सुद्धा नीट न येणारी आता स्पेसच्या गोष्टी सांगते तेव्हा सांगावंस वाटतं की, तुझ्या आई-वडिलांना असं तुझ्या वहिनीने केलं तर? घरात पाऊल ठेवलं की घरातील वातावरण लगेच लक्षात येते. एकीकडे आई कधी पाणावलेले डोळे लपवताना दिसते तर कधी बायको डोळ्यांतील राग व्यक्त करताना.

काही मोठी कारणं असावीत तर मुळीच नाही. विशेष असं काहीच नसते. आता आईचं वय झालंय, खाता पिताना सांडा सांडी होणार. त्यावरून तर कधी रात्री झोप न आल्याने लाईट लावून जप करत बसल्यावरून. अशावेळी आईला काहीतरी म्हणावं अशी तिची अपेक्षा. तिच्या मते तिने काहीही केलं तरी त्यात चुका काढणारच. तिच्या मते त्यांना मोठ्या सुनेचं जास्त कौतुक.

बायकोच्या समाधानासाठी एक-दोनदा आईला समजावण्याचा प्रयत्न केला देखील. पण नंतर आईच्या डोळ्यांतील पाणी स्वस्थ बसू देत नव्हतं.

म्हटलं आईची बाजू जाणून घ्यावी तर कधी कधी सुनेकडून आपल्याला मिळणारी वागणूक तिला सहन होत नाही. काही गोष्टींत होणारी नासधूस, गोष्टींचा अपव्यय सहनशक्तीच्या पलीकडे असतो. संसारासाठी गोष्टी जपून वापरायला हव्यात असं तिचं मत.

"कधी तब्येतीची तक्रार असतानापण सुनेकडून होणारे दुर्लक्ष कोणाला सांगावं तिने? नात्यातील लोकांना तिला समजवण्यासाठी सांगावं तर आपली बदनामी करतात" सासूबाई चा शिक्का ठरलेला. इकडे आड तिकडे विहीर! कोणाची बाजू घ्यावी समजत नाही. मंदारने आपली खरी व्यथा मांडली.

"आधी वडील नसल्याने आईने केलेले कष्ट आम्ही बघितलेले. म्हटलं शिकून मोठा होईन, सगळं मार्गी लावेन, सुखात राहेन, पण आता सुख नावाला सुद्धा सापडेनासं झालं आहे. कामाचे व्याप सुद्दाम वाढवून घेतो की जास्तीत जास्त व्यस्त राहेन त्यात जेणेकरून हा त्रास विसरता येईल. रोज रोजच्या कटकटीला कंटाळून आता फिरतीची नोकरी पत्करली. घरापासून जास्तीत जास्त बाहेर राहण्याचा प्रयत्न करत असतो. कारण घरात मिळणारी शांतता आता हरवलीय. पण कसलं काय. हारलो मी आता". मंदारने आपली हतबलता आपल्या आसवांसोबत आमच्या पर्यंत पोचवली. इतके दिवस आम्हाला आनंदी भासवणारा मंदार इतकं काही सहन करत असेल वाटलंच नव्हतं. कॉलेज दिवसांत दारूला नको म्हणणारा मंदार दारू कडे का वळला हे पडलेलं कोडे आता उलगडायला सुरवात झाली. एखादा पितो इतकंच आपण ऐकतो पण तो का प्यायला लागला ह्याच्यामागे सुद्धा अनेक कारणं असू शकतात हे जाणवलं.

पुरुष दारू का पितो?

कधी विचार केला आहे का?

कोणी जन्मजात तर पिणारा नसतोच.

ह्याची सुरवात होते कधी मित्रांतून, कधी आजूबाजूच्या परिस्थितीतून, तर काहीवेळा कुतूहलातून सुद्धा.

ह्यातील मित्र आणि कुतूहल हे वगळले तर राहिलेले ७० टक्के पिणारे असतात ते परिस्थितीच्या पुढे हतबल होऊन.

अपार कष्ट, मेहनत आणि जीवाच रान करून पण हातात शून्य उरतं तेव्हा मग कुठेतरी ते मनाला त्रासदायक होऊ लागते आणि मग सुरू

होते सुरवात ते पराभवाचे क्षण विसरायची. म्हणून तर कदाचित चार पेग पोटात गेल्यावर सुरवात होते मोठ्याने बोलण्याची, जे शुद्धीत बोलताना त्रास होऊ शकतो ते दारूच्या नशेच्या नावाखाली बोलून टाकले जात! बाकींना वाटते की, समोरचा नशेत बोलतोय पण खरंतर आपण काय बोलतोय हे ज्याचं त्याला पूर्ण ठाऊक असते. आपण काहीही बोललो तरी दारूच्या नावाने खापर फोडता येईल ह्याचा विश्वास असल्याने पिऊन बोलणारा बिनधास्त असतो. अशावेळी माणूस जास्त भावनाप्रधान असतो, कदाचित म्हणूनच पिऊन रडणारे सुद्धा कमी नसतात.

मनातील सल, राग, उद्विग्नता बाहेर काढली जाते ती ह्याच निमित्ताने.

काही जण खुल्याने व्यक्त होतात तर काही जण आतील सलणाऱ्या दु:खाला झाकू पाहतात. काहीही असलं तरी तात्पुरता इलाज होऊन जातो.

असे अनेक विचार मनाला शिवून गेले.

असे तात्पुरते इलाज शोधणारे नशेच्या आहारी जातात आणि जगण्याची उमेद पार घालवून बसतात. नट आणि अभ्यासू व्यक्तिमत्त म्हणून नावजेला सुधांशू सारखा माणूस स्वत:ला संपवतो ते कदाचित अशाच अनेक कारणांमुळे. विचारांची ही सरबत्ती सरू असतानाच मंदारने अजून एक पेग घशात परत घटा घटा टाकला.

“मंदार बस कर,जास्त नको घेऊ आणि अशापद्धतीने तर मुळीच नको घेऊस” इतकावेळ काहीच न बोलणारा अमित आता जरा वरच्या



सुरात बोलून मंदारला थांबवायचा प्रयत्न करत होता.

“तुला माहितीय मंदार आपल्याला सगळं दोन मिनटात हवं असतं. बस साठी आपल्याला थांबायला वेळ नाही आपण टॅक्सी बुक करतो, नाश्ता बनवायला वेळ नाही आपण मॅगी खाऊन

निघतो. कोणत्याही बाबतीत आपल्याला आजकाल धीर धरायला वेळ नसतो. आजारपण आले की आयुर्वेदाकडे न वळता ऍलोपॅथी करतो. थोडं दुखलं पेन किलर घेत बसतो. इंजेक्शन्स घेतो पण त्या सगळ्याचे साईड इफेक्ट्स सुद्धा आता हे मात्र सोयीस्कररित्या विसरतो.

थोडक्यात काय तर आपण आपली सहनशक्तीच्या मर्यादा कमीत कमी करत चाललो आहोत. जे झालं किंवा जे होतंय ते चुकीचंच आहे. पण त्यावर असा स्वतःला त्रास करून घेणे चुकीचं आहे.

घराबाहेर राहून किंवा दारू सिगरेट घेऊन प्रश्न सुटत असतील तर नक्की कर. तू स्वतःला पळवतो आहेस प्रॉब्लेम पासून. वहिनींशी बोल, आईशी बोल त्यांना दोघीही हव्यात असं सांग. बायकोला आईने काय काय केलं तुझ्यासाठी ह्याची जाणीव करून दे. आईला बायको किती त्यांचा आदर करते हे पटवून दे. एकदा का ह्या गोष्टी झाल्या की मग दोघींना पण व्यस्त करून टाक. एकत्र कुटुंब पद्धती असलेल्या घरांशी भेट कर, तेथील लोकं कसे राहतात ते दाखव वहिनींना. बाळाला सांभाळणे त्याला खाऊ भरविणे किंवा काही मूल्य संस्कार करणे ह्यासाठी आज्जी आजोबा नावाची विद्यापीठे किती गरजेची असतात हे वहिनींना पटवून दे. वहिनी घरातच असल्याने कंटाळत असतील त्यांना बाहेर पडूदे, छोटी छोटी कामं त्यांना करायला सांग. बँकेची कामे, महानगरपालिकेतील कामे, बिल्स ह्यांची ओळख त्यांना करून दे. रिकामं मन भुताचं घर असं नको व्हायला. मग रिकाम्या वेळात बाजूच्या बायका हेच बोलत बसणार. एकमेकींच्या सासरचं सांगत बसणार हे आधी थांबव. लागल्यास छोटी शिलाई मशीन आणून दे. काही नवीन कला त्यांना शिकूदे. एकदा का त्या कामात व्यस्त झाल्या की त्यांना आईची मदत लागणार आणि ज्याची आपल्याला नितांत गरज असते त्याला आपण सांभाळून घेतोच. म्हणून मित्रा बायकोला आईची गरज आहे हे जाणवायला हवंच.

आई बद्दल सांगायचं झालं तर त्यांना आरोग्यासाठी सकाळी बाहेर फेरफटका मारायला जाऊ दे, काही लाफिंग ग्रुप असतात जे सकाळी बागेत जोरजोराने हसताना दिसतात त्यांना जॉईन करून दे. आता ह्या वयात स्वतःची काम स्वतः न करण्याचा अट्टहास न करता ती दुसऱ्यांना करायला

सांगू दे. ज्या पद्धतीने काम होईल ते स्वीकारून पुढे जाऊ दे. काळानुरूप परिस्थिती बदलली ह्याचा वेध घेत नवीन बदल स्वीकारू देत. आपले छंद कला जोपासणे पुन्हा सुरू करु दे. काही गोष्टींकडे दुर्लक्ष करणे क्रमप्राप्त आहे.

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तुला स्मार्ट मॅनेजरचा रोल घरात सुद्धा निभवावा लागेल. कधी पॉझिटीव्ह कधी नेगेटिव्ह मोटिव्हेशन देत पुढे न्यावं लागेल दोघीनांही. एक टीम बांधून काम करून घ्यावं लागेल आणि काम असेल घरात शांतता राखणे. परफॉर्मन्स बोनस म्हणून कधी हॉटेलिंग, चित्रपट बघणे कधी देव दर्शन तर कधी फिरायला घेऊन जाणे गरजेचं आहे. पर्सनल फीडबॅक घेण्यासाठी बाहेर चालायला घेऊन जात जा. जेवल्यावर तितकी शत पावली सुद्धा होईल आणि एकीने दुसरीला काय म्हटले ते सुद्धा कळणार नाही. आपण जर दहा वेगळ्या वेगळ्या प्रवृत्तीच्या लोकांना सांभाळून काम करून घेऊ शकतो तर घरी का नाही? प्रश्न फक्त आपण माणसं कशी सांभाळतो त्याचा आहे. म्हणून जास्त ताण न घेता ह्या छोट्या छोट्या गोष्टींकडे कानाडोळा करत त्यांना इतकं व्यस्त कर की एकमेकांच्या तक्रारी करायला वेळच भेटायला नको." अमितने आपल्या भात्यातील काही राखीव बाण मंदारच्या स्वाधीन करून अशांततेचा मत्स्यभेद करण्यासाठी काही युक्त्या सुचवल्या.

सगळं बोलता बोलता जवळपास सकाळ व्हायची वेळ झालेली. मनातील दुःख व्यक्त करून मंदारला आता फार हलकं वाटत होते. अमितचे आश्वासक बोलणे त्याला मनाला उभारी देत होते. आपण आजपर्यंत ह्या दृष्टिकोनातून गोष्टींकडे बघितलेच नाही ह्याची त्याला जाणीव झाली. आपल्या आनंदाचा रिमोट दुसऱ्याच्या हातात न देता रिमोटली आपल्या आनंदासाठी त्यांची वेगळी वेगळी  बटणे दाबावी लागतील ह्याचा त्याला अंदाज आला. संसार हा फक्त भाव भावनेतून न करता वेळ प्रसंगी हुशारपणाने सुद्धा करावा लागतो हा नवा विचार मनात अंकुर रुजवू पाहत होता.

काही तासांपूर्वी भरलेली बाटली आणि दुःखं आता पूर्ण खाली झाली होती. रात्र आता सूर्योदयाकडे झुकू पाहत होती. कोंबड्याने आरव द्यायला सुरवात केली होती, काळोखाची जागा प्रकाशाने घ्यायला सुरवात केली होती .

दिवाळीच्या हर्षभरीत शुभेच्छा!

# साई सिध्दनाथ

## कन्स्ट्रक्शन





# With best compliment from

MCC

# M.C.CHANDANANI CONST.CO

## REGD.GOVT.CONTRACTORS

OFFICE: A-212, Woodland Complex, New Link Road, Furniture Bazar, Ulhasnagar-3
PLANT: Survery No.35/6, Maharalgaon, Kalyan-Murbad, Post Varap, Kalyan.
Email : mcchandnani@gmail.com

## काव्यसृष्टी

# ये ना लवकर...

किलबिल किलबिल
तव ऐकण्या घरून
घरटे बसले रुसून,
पाखरा ये ना लवकर
उडून





पंख जरी झाले जखमी
जखमा येतील भरून
नभी भरारी घेऊन,
पाखरा ये ना लवकर
उडून

झेप तव पाहून गगनी
नभ निघाले उजळून
मेघही गेले पळून,
पाखरा ये ना लवकर
उडून

पुन्हा नव्याने जरा दमाने
भुते भूतकाळी सोडून
पंख उंच पसरून,
पाखरा ये ना लवकर
उडून

-प्रा.अरुण पाटील

# वारी

कधीच केली नाही आईने वारी
सदोदित करीत राहिली ती
केरवारे, रांधणं, घर आवरणं
साधी साडी नेसून घरात वावरणं
आपल्या लेकरांवर, संसारावर प्रेम करणं
एवढचं जमलं त्या माउलीला...

रोज संस्कारांच्या तुळशीला
पाणी घालत रहाण्याचं काम तिचं
इमाने इतबारे करत राहिली ती
मनीच्या व्यथा लपवत
तिचा संसार हीच होती तिची पंढरी
आणि तिचे भौतिक रिंगणही...

घरात उभा होता तिचा
काबाडकष्ट करणारा विठ्ठल
दक्ष, खंबीर, संसार चालवणारा
घराच्या उंबऱ्यावर उभे राहून...

आणि ती असते माउली
तिच्या लेकरांची नि
घरादाराचीही
तिच्या पंढरीची वारी करणारी
तिच्या संस्कारांची तुळस लेवून
अनादी काळची माता...

-कविता झुंजारराव

# गोरखगड

गिरिदुर्ग असा
हा गोरखगड
सह्याद्रीची कुशी
ज्याला नाही तोड ।।१।।
२१३७ फूटी उंची
बसले ध्यानस्थ नाथ
येतोय दर्शनाला
पाठवा धुक्याचा रथ ।।२।।
मच्छिंद्रनाथांच्या पुढे
गोरक्षनाथ उभे
पाहावे दुरूनच
अलभ्य दर्शन लाभे ।।३।।
खोदलेली शिल्पे
शिलालेख भारी
पाण्याची टाकी
तहान भागवेल सारी ।।४।।
कातळात कोरल्या पायऱ्या
स्वागताला भव्य व्दार
भुयारी जिन्यातून
निसर्ग दिसे हिरवेगार ।।५।।
शिवशाही काळात
अति महत्वाचे स्थान
घाट टेहळणीसाठी
दिला तुलाच मान ।।६।।

-हरिश्चंद्र मुकुंद दळवी

# कितीही थकू दे

कितीही वेळ होउ दे
झोपण्या आधी एकदा तरी
त्याच्या अंगावरून ती हात फिरवणार
जणू आपल्या मनातील गूज
स्पर्शातून त्याला सांगणार
ती दुःखी असो वा आनंदी
ती त्यालाच जाऊन खेटणार
नकळत बनलेलं घट्ट त्यांचं नातं
किचनचा ओटा आणि ती
तिला तो हवा तसाच लागणार
त्याच्याकडे समाधानाने नजर टाकूनच
ती झोपायला जाणार
त्यांची आगळी वेगळी प्रेमकहाणी तुम्हाला
नाही समजणार !

**- वैभव दि. धनावडे**

# अशा सांजवेळी बहाणा तुझा

अशा सांजवेळी बहाणा तुझा
तरी छेडतो बघ दिवाना तुझा..

गुलाबी सकाळी तुला पाहता
खुळा वेड लावी उखाणा तुझा

तुझ्यासारख्या सुंदरीला हवा
मनी छेडणारा तराणा तुझा

किती आणाभाका तुझ्या संगती
दिलासा हवा सांगताना तुझा

कशाला अशी हात तू सोडते
जरी साथ देतो 'घराणा' तुझा

**- मंगेश मोरेश्वर म्हात्रे**



With best compliment from

# Agni Aero

# PRODUCT



gnp
GROUP
GALAXY
COMMERCIAL & INDUSTRIAL
HUB
AMBERNATH
PERFECT PLACE FOR YOUR BUSINESS
max
मॅक्स
TRENDS
Actual Image
₹25 LACS* ONWARDS
SHOPS, OFFICES & MFG. UNITS
₹80 LACS* ONWARDS
COMMERCIAL SHOPS & OFFICES
BRANDS AT GALAXY
KFC
TRENDS
max
mod
MR.DIY
Always Low Prices
SUBWAY
& MANY MORE
DESIGNED BY
HAFEEZ
CONTRACTOR
*T&C Apply
GALAXY
INDUSTRIAL HUB
Artist's Impression
GNP GALAXY PHASE 1
MAHARERA NO. P51700002007
GNP GALAXY PHASE 3
MAHARERA NO. P51700028923
9699936936
www.gnpgroup.in
The project has been registered via MahaRERA registration number Phase 1 : P51700002007, Phase 2: P51700002123
& Phase 3: P51700028923 and is available on https://maharera.mahaonline.gov.in under registered projects.

# पाककृती

## दह्यातील मिरच्या



**साहित्य:** १किलो साध्या कमी तिखटपणा असलेल्या मिरच्या, जास्त तिखट आवडत असेल तर तिखट व साध्या दोन्ही, अर्ध्या अर्ध्या घ्याव्यात.पाव किलो दही, चवीनुसार मीठ, ५ चमचे जिरेपूड, चवीला थोडीशी साखर

**कृती:** मिरच्यांचे देठ काढून पाण्यात थोडे मीठ टाकून शिजवून घ्याव्यात.अर्ध्या शिजत आल्या की चाळणीवर निथळत ठेवाव्या. पाव किलो दह्यात साखर मीठ टाकून वरील निथळून काढलेल्या मिरच्या टाकून छान शिजवून घ्याव्या. दही आटून कोरडे होत आले की त्यात जीरेपूड टाकून गॅस वरून खाली काढून ठेवायचे. थोडे थंड झाले ताटात पसरून उन्हात सुकवायला ठेवायचे.छान सुकल्या की बरणीत भरून ठेवायचे. खिचडी वरणभात यासोबत या दह्यातील मिरच्या खूप चविष्ट लागतात.

**सूचना:** मिरच्या अख्या किंवा तशाच अखंड वापरू शकतो.दह्यातील मिरच्या करण्यासाठी दही जास्त आंबट असलेले वापरावे म्हणजे आंबट तिखट गोड अशी संमिश्र चव लागते.तेलात तळण्याची गरज नाही थोड्याश्या तेलावर परतून देखील लगेच छान खरपूस भाजल्या जातात.

**- सुचित्रा कुंचमवार**

## छुपे रुस्तुम गुलाबजाम



**साहित्य-** गुलाबजाम साठीः १ मध्यम आकाराचा बटाटा (अंदाजे १०० ग्राम), तितकाच मावा (खवा) (१०० ग्राम), पनीर १०० ग्राम जेवढा बटाटा, मावा,पनीर आहे त्याच्या अर्धे शिंगाडा किंवा वरीचे पीठ.(५० ग्राम)

**गुलाबजाम पाकासाठी:**

२ वाटी साखर, २ वाटी पाणी, १ चमचा गुलाबजल, तळण्यासाठी शुद्ध तूप लागेल तितके, अर्धा चमचा इलायची पावडर, काजू,बदाम पिस्ता ऐच्छिक

**कृती:** सर्वप्रथम बटाटा उकडून छान थंड होऊ द्यावा.त्यानंतर त्याची साल काढून बारीक किसनीने किसून घ्यावे.पनीर आणि मावा देखील असेच बारीक छान किसून घ्यावे.हे सर्व मिश्रण छान एकजीव करून हलक्या हाताने मळून घ्यावे.या मिश्रणात हळूहळू शिंगाडा किंवा वरीचे पीठ मिसळून गोळा मळून घ्यावा.याला पाणी किंवा दूध वापरण्याची गरज नाही, पनीर,मावा व बटाटा याच्या मिश्रणातच गुलाबजामचे पीठ मळून घ्यायचे आहे.आता हे मिश्रण थोडे मुरण्यासाठी झाकून ठेवा.

**- सुचित्रा कुंचमवार**

# मक्याचे पॅटीस

**साहित्य** – मक्याच्या कणसाचे दाणे, कांदे, टोमॅटो, आले, लसुण, तिखट, मीठ, हळद, तेल, जिरे, मोहोरी, बटाटे.

**कृती** – प्रथम बटाटे उकडून घेऊन ते उकडलेले बटाटे किसून गरजेपुरते मीठ घालून मावा बाजूला करून ठेवा.

दोन मोठे कांदे, टोमॅटो चिरून घ्या. मक्याचे दाणे मिक्सरमधून काढून घ्या. आता फोडणी तयार करा. गॅस वर कढलं ठेऊन त्यात तेल घाला. तेल गरम झाले की कांदा घाला चांगला लाल होईपर्यंत परतून घ्या. टोमॅटो घाला. आले लसुण पेस्ट घाला तिखट, हळद, मीठ घालून मिश्रण परता वर कोथिंबीर व मक्याचे काही दाणे घालून मिश्रणाला फक्त एक वाफ द्या. झाले आता आत बसायचे मिश्रण तयार.

आता बटाट्याच्या माव्याची गोल वाटीसारखी पारी तयार करा. त्यात मिश्रणाचा एक गोळा भरा. पारीचे तोंड बंद करून घ्या. छान लाडू आकार तयार होईल. त्याला थोडे दाबून पेढ्यांचा आकार द्या. झाले पॅटीस तयार. आता बीड किंवा फ्राइंग पॅनवर तेल घालून मंदाग्नीवर हे पॅटीस शेकून घ्यावे. झाले मक्का पॅटीस तयार. सॉस सोबत वाढावे.

**-कल्पना मापूसकर**



# मिरम चटणी



**साहित्य:** १ वाटी चणाडाळ,१ वाटी उडीद डाळ,१ वाटी मुगडाळ, पाव वाटी चिंच, पाव वाटी गूळ, अर्धी वाटी तीळ, ४ चमचे धने, ५ चमचे जिरे, १ वाटी लाल तिखट (आपल्या आवडीनुसार कमी जास्त करू शकतो) मीठ चवीनुसार, २ पळी तेल

**कृती:** वरील सर्व डाळी नुसत्याच खमंग लालसर होईपर्यत भाजून घेणे.

धने, जिरे, तीळ पण भाजून घेणे. २ पळी तेल गरम करून त्यात लाल तिखट व चिंच टाकून कालवून ठेवणे. थंड झाल्यावर सर्व डाळी त्यात जिरे धने तीळ चिंच गूळ व चवीनुसार मीठ टाकून मिक्सरमध्ये थोडे जाडसर वाटून घेणे. तेलात तिखट टाकून ठेवले आहे त्यात वरील सर्व मिश्रण टाकून छान एकजी होईपर्यत कालवून घेणे.

**सूचना: ही चटणी वर्षभर टिकते,आंबट गोड तिखट चवीची चटणी भात, खिचडी, पोळी, भाकरी कशासोबतही छान लागते.**

**– सुचित्रा कुंचमवार**

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

# ज्ञानदीप

# मजूर संस्था



# वास्तुटीप्स

१.घरातील वय वर्ष २५ ते ६० असलेल्या कमावत्या व्यक्तीने उत्तरेला पाय करून झोपावे. उत्तर दिशा ही उत्तरोत्तर प्रगती करणारी असते त्यामुळे कोणतेही काम करताना उत्तरेला तोंड करून करावे.

२.घरामध्ये अडगळ, भंगार किंवा जुन्या बंद पडलेल्या वस्तू ठेवणे म्हणजे आपणच आपली प्रगती थांबविण्यासारखे आहे. घराची उत्तर दिशा बंद असेल तर कर्ज-बाजारी होण्याचे प्रमाण वाढते आणि घरातील आर्थिक समस्या वाढतात.

३.नवीन घर घेताना वास्तुशास्त्रानुसार घर आहे की नाही हे पाहुन घर विकत घ्यावे म्हणजे घरामध्ये सुख-समृध्दी आणि उत्तम आरोग्य राहते.

४.नवीन घर घेताना घराचा दरवाजा उत्तर किंवा पूर्व दिशेला असावा म्हणजे घराच्या दरवाजातून बाहेर बघताना उत्तर किंवा पूर्व दिशा असावी.

५.नवीन घर घेताना दक्षिण, पश्चिम, नैऋत्य आणि आग्नेय या दिशातुन येणारे दरवाजे टाळावेत.

भाग्योदयासाठी घराच्या हॉलमध्ये बांबु ट्री म्हणजेच लकी ट्री ठेवावा.

६.घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये आणि घरामध्ये शुभ उर्जा भक्कम रहावी यासाठी मुख्य दरवाजाला लाकडी उंबरा बसविणे महत्वाचे आहे.

७.घराच्या मुख्य दरवाजावरती वाळलेली फुले, पाने, सुकलेली तोरणे काढून टाकावीत . म्हणजे घरामध्ये शुभ उर्जा प्रवेश करण्यास कोणताही अडथळा निर्माण होत नाहीत.

८.घरातील सर्व खोल्यांमधील घड्याळे ही उत्तर किंवा पुर्व भिंतींवर लावावीत म्हणजे घड्याळाकडे बघताना आपले तोंड पुर्व व उत्तर या शुभ दिशांना होते.

९.घरातील सर्व खोल्यांमधील कॅलेंडर्स ही पूर्व किंवा उत्तर भिंतींवर लावावीत म्हणजे कॅलेंडर कडे बघताना आपले तोंड शुभ दिशांना होते.

१०.कोणतेही काम करताना आपले तोंड उत्तर किंवा पुर्व दिशेला असावे म्हणजे आपले काम वेळेत आणि विना अडथळा पार पडते .

११.झोपताना कधीही दक्षिणेला पाय करून झोपू नये त्यामुळे आजारपण वाढते आणि माणुस कर्ज बाजारी होतो .

घराच्या ईशान्य दिशेला वजन ठेऊ नये. ईशान्य दिशा ही नेहमी हलकी आणि मोकळी ठेवावी म्हणजेच घरामध्ये शांतता राहते .

१२.सुख-समृदधीसाठी घराच्या मुख्य दरवाज्यासमोर बालाजीचा फोटो लावावा .

१३.बेडरूममध्ये देवघर किंवा देवाची मूर्ती, फोटो असु नये .

१४.लाल, काळा, मरून, हे तीन कलर घरामध्ये जास्त वापरू नयेत यामुळे घरा मध्ये सुख - समृदधीदायक आयुष्यासाठी अडचणी येऊ शकतात .

१५.झोपताना बेड स्विच बोर्ड पाशी येऊ देऊ नये. त्यामुळे निद्रानाशेचा अडथळा येऊ शकतो .

# आरसा



१)आरशाचा विचार केला तर आपल्या घरात आरसा कुठेही लावला नाही पाहिजे. जर आरसा असेल तर त्याला पडदा लावला पाहिजे, कारण आरशात नेहमी बाहेरची प्रतिबिंबं पडतच असतात, आणि ती प्रतिबिंबं पॉझिटिव्ह व निगेटीव्ह असू शकतात.

२)ज्या ठिकाणी तुम्ही आरसा लावला असेल तेथे त्या आरशातून बघणे, की बाहेरचं प्रतिबिंब पडतं का नाही, जर पडत असेल तर तेथून आरसा काढून टाकणे.

३)आरसा हा नेहमी बंद असावा, कारण तो जर ओपन  असेल तर सर्व प्रतिबिंबे तो खेचत असतो, तेही डबल वेगाने आपल्यावर टाकत असतो.

४)आरशाचा महत्त्वाचा गुणधर्म आहे की, आलेली वस्तू फेकून देणे, हे त्याचं कामच आहे आणि म्हणून आरसा नको, कारण आरसा खूप निगेटीव्ह आहे.

५)आरशाला भारतीय वास्तुशास्त्रात प्रवेश नाही.



# वास्तुटीप्स

•घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये म्हणुन मुख्य दरवाजाजवळ तुळस असणे आवश्यक आहे .
•दरवाजाच्या चौकटीवर आतून बाहेरून विघ्न हर्त्याची म्हणजेच गणपतीची टाईल्स लावणे आवश्यक आहे .
•घराच्या प्रत्येक रूममध्ये खडे मिठाचा बाऊल ठेवणे .
•आठवडयातून एकदा खडे मिठाच्या पाण्याने फरशी पुसणे यामुळे घरामध्ये सुख समृध्दी राहते.
•मुलांची शैक्षणिक प्रगती चांगली होण्यासाठी त्यांना पूर्वेला डोके आणि पश्चिमेला पाय करून झोपवावे .
•मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी पूर्वेला तोंड करून अभ्यासाला बसवावे .
•लहान मुलांना घराच्या नैऋत्य दिशे मध्ये झोपू नये त्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगतीत अडथळे येऊ शकतात .
•घरामध्ये पैसा, संपत्ती, ऐश्वर्य टिकवून राहण्यासाठी घराच्या नैऋत्य दिशेमध्ये तिजोरी किंवा पैशाचे कपाट ठेवावे .
•घरामध्ये शैक्षणिक आर्थिक प्रगती व्हावी यासाठी भडक रंगाचे कपडे वापरणे टाळावे .
•ईशान्य दिशेला वास्तुदोष असेल तर मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतात .
•नवीन घर बांधताना किंवा विकत घेताना घराचा आकार आयताकृती किंवा चौकोनी असावा .
•मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी सरस्वतीचे प्रज्ञावर्धन स्तोत्र आणि गणपती अथर्वशीर्ष मुलांनी रोज म्हणावे .
•उत्तम वैवाहिक आयुष्यासाठी नवरा- बायकोंनी दोन जोडलेल्या बेड वर झोपू नये .
•नवीन घर घेताना पहिल्या व शेवटच्या मजल्यावरचे घर विकत घेणे टाळावे .
•आरोग्यदायी जीवनासाठी घरा मध्ये पिवळा , काळा , लाल हे रंग कोठेही येऊ देवू नये .
•घर बांधताना यशस्वी जीवनासाठी नैऋत्य दिशेला बोअरिंग , विहीर पाण्याची टाकी बांधु नये .
•दक्षिणेला पाय करून झोपु नये कारण आरोग्य, पैसा व मानसिक ताण यांची हानी होते .
•घराच्या मुख्य दरवाजा जवळ उतरता किंवा चढता जिना असेल तर अनेक वाईट घटनांना सामोरे जावे लागते .
•घराच्या मुख्य दरवाजा समोर लिफ्ट असेल तर घरामध्ये आर्थिक,शारीरिक व मानसिक हानी होते .
•हिंस्र पशु पक्षांची, जंगली जनावरांची तोंडे, घरामध्ये लावु नयेत .
•घरात किंवा घराच्या बाहेर काटेरी वनस्पती ठेवु नयेत .
•उत्तम प्रगती हवी असेल तर काळया शाईचे पेन वापरू नयेत .
•उत्तम प्रगती साठी तांब्याची अंगठी करंगळी शेजारच्या बोटामध्ये म्हणजेच अनामिकेमध्ये धारण करावी .
•घरामध्ये बुडते जहाज किंवा वादळामध्ये फसलेली नौका यांची चित्रे भिंतींवर लावु नयेत .
•घरामध्ये कोठेही लाल,मरून,काळया रंगाचे पडदे वापरू नयेत .
•घराच्या मुख्य दरवाजावरती भयानक चित्रे लिंबु, मिरची, राक्षसाची तोंडे असे चित्र लावू नयेत .
•घरामध्ये अश्रु ढाळणारया स्त्रियांची, पुरुषांची किंवा मुलांची चित्रे लावु नयेत.
•घराच्या मुख्य दरवाजावरती सुकलेली फुले, वाळलेली पाने यांची तोरणे जास्त दिवस ठेवु नयेत .

# वास्तुटीप्स

◆घराचा मुख्य दरवाजा पुर्ण उघडणे महत्वाचे आहे  म्हणजेच  मुख्य दरवाजाच्या आत आणि बाहेर कोणताही अडथळा टेऊ नये .

◆घरामध्ये सुख -समृदधी मिळावी यासाठी सकाळ-संध्याकाळ धुप, अगरबत्ती, निरंजन लावणे महत्वाचे आहे .

◆घरामध्ये सुख -समृदधी मिळावी यासाठी घरामध्ये नकारात्मक बोलणे, भांडणे टाळावीत .

◆मुलांच्या उत्तम प्रगतीसाठी त्यांची बेडरूम ईशान्य, उत्तर किंवा वायव्येला    असावी.

◆मुलांचे स्टडी टेबल पुर्व आणि ईशान्य दिशेमध्ये असावेत .

◆मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी स्टडी टेबलचा आकार आयताकृती चौकोनी असावा गोलाकार नसावा .

◆मुलांच्या बेडवरती किंवा स्टडी टेबलवरती कपाट असु नये .

◆आपल्या घराचे पार्कींग कोणत्याही दिशेस असो परंतु पार्कींगमध्ये गाडी लावताना उत्तर किंवा पूर्वेला तोंड करून लावावी .

◆नवीन कार घेताना लाल ,काळा व मरून कलर या रंगाची कार घेणे टाळावे .

◆नवीन कार घेताना कारच्या नंबर प्लेटसच्या अंकांमध्ये चार व आठ हे अंक येऊ देऊ नये .

◆नवीन कार घेताना कारच्या नंबर प्लेटमधील अंकांची बेरीज तीन ,सहा ,नऊ अशी असावी अंकांची टोटल चार व आठ नसावी .

◆कार प्रोटेक्शनसाठी कारच्या डिक्कीमध्ये खडे मीठ कापडी पिशवी मध्ये भरून ठेवावे .

◆घराच्या आग्नेय दिशेला टॉयलेट पाण्याचे बेसिंग येऊ देऊ नये .

◆घर बांधताना ईशान्य दिशेला जिना येऊ देऊ नये .

◆घराची उत्तर दिशा बंद असेल तर हेल्थ आणि वेल्थ प्रोब्लेम येऊ शकतात .

◆घरामध्ये देवांचे फोटो भिंतींवर टांगुन ठेऊ नये त्यांचे पावित्र्य भंग होते .

◆घरातल्या कर्त्या व्यक्तिने वायव्य दिशेला झोपु नये .

◆घरामध्ये कोठेही फॉल सिलिंग करु नये घराची उंची कमी होते त्यामूळे घरातील अडचणी वाढु शकतात.

◆इन्वरटर, यु. पी. एस बॅटरी घराच्या आग्नेय दिशेला असावा .

◆ऑफिस मधले टेबल आयताकृती किंवा चौकोनी असावेत गोलाकार नसावेत .

◆ऑफिस विकत घेताना ऑफिसचा दरवाजा उत्तर , पूर्व किंवा ईशान्येचा असावा .

◆व्यवसाय  करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिने  उत्तर दिशेला तोंड करून बसावे .

◆ऑफिस मधील खिडक्या उत्तर आणि पुर्वे दिशेला असतील तर भरपुर प्रगती होते .

◆व्यावसायिकाने झोपताना उत्तरेला पाय करून झोपावे म्हणजे व्यवसायात लाभ भरपुर होतो .

◆ऑफिसमध्ये अकाउंट डिपार्टमेंट उत्तर किंवा वायव्य दिशेला असावे .




PHANCODE

# MOUNT AIRO

NATURE'S DIVERSITY

## 1 BHK SKY DECK RESIDENCES

PARTH

EXCELLENCE IS A COMMITMENT

Strategic Partner

PHANTOM ADVISORY LLP

**+91 95 94 22 73 43**

**Site Address:** Parth Lakefront, Opp. IG International & Tata Strive, Thane Belapur Road, Airoli, Navi Mumbai - 400 708.

*The project has been registered under the name Parth Lakefront via Maharera registration no. P51700018725 and is available on the website : https://maharera.mahaonline.gov.in*

# With best compliments from

NISARG GROUP

# NISARG GREENS

AMBERNATH EAST

PHASE - II

JUST 5 MINS FROM AMBERNATH RLY. STN.



Discover The Pinnacle Of

## Luxury Living!

MahaRera Reg. No.

| Phase II A | Phase 2B | Phase 2C | Phase 2D | Phase 2E | Phase 2F |
|---|---|---|---|---|---|
| P51700008839 | P51700022786 | P51700022586 | P51700031807 | P51700031798 | P51700031797 |